# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ६०

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०६.२०१६ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जून-२०१६ ची मासिक मा.महापालिका सभा सोमवार दि.२०.०६.२०१६ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

६. मा.भालेकर अरुणा दिलीप

७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

९. मा.सायकर अजय शंकरराव

१०. मा.जाधव साधना रामदास

११. मा.जाधव राहुल गुलाब

१२. मा.आल्हाट मंदा उत्तम

१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१४. मा.काळजे नितीन प्रताप

१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१६. मा.पात्रे राम संभाजी

१७. मा.बाबर शारदा प्रकाश

१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.पवार संगीता शाम

२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.खाडे तानाजी विठ्ठल

२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३१. मा.राजू मिसाळ

३२. मा.नंदा विकास ताकवणे

३३. मा.नेटके सुमन राजेंद्र

३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३७. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४१. मा.अपर्णा निलेश डोके

४२. मा.अनंत सुभाष को-हाळे

४३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४४. मा.पवार मनीषा काळूराम

४५. मा.प्रसाद शेट्टी

४६. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४९. मा.शेख अस्लम शैकत

५०. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५१. मा.वाबळे संजय मल्हारराव

५२. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५३. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५४. मा.सुपे आशा रविंद्र

५५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५६. मा.मोहिनीताई विलास लांडे

५७. मा.गोफणे अनुराधा देविदास

५८. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५९. मा.महेशदादा किसन लांडगे

६०. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६२. मा.लोंढे शुभांगी संतोष

६३. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६४. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६५. मा.सावळे सिमा रविंद्र

६६. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६७. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६८. मा.पालांडे सुजाता सुनिल

६९. मा.बहल योगेश मंगलसेन

७०. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७१. मा.कदम सदगुरु महादेव

७२. मा.गिता सुशील मंचरकर

७३. मा.कैलास महादेव कदम

७४. मा.छाया जगन्नाथ साबळे

७५. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७६. मा.टाक अरुण मदन

७७. मा.आसवाणी सविता धनराज

७८. मा.वाघेरे सुनिता राजेश

७९. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८०. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८१. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८२. मा.काळे विमल रमेश

८३. मा.पाडाळे निता विलास

८४. मा.विनोद जयवंत नढे

८५. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८६. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८७. मा.विमलताई सुरेश जगताप

८८. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८९. मा.बारणे निलेश हिरामण

९०. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९१. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

९२. मा.बारणे माया संतोष

९३. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९४. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९५. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९६. मा.कलाटे स्वाती मयुर

९७. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९८. मा.चौंधे आरती सुरेश

९९. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१००. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०१. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०२. मा.जवळकर वैशाली राहुल

१०३. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०४. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०५. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०६. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०७. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०८. मा.जम सोनाली पोपट

१०९. मा.प्रशांत शितोळे

११०. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

१११. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११२. मा.गायकवाड संध्या सुरदास

११३. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११४. मा.शेंडगे आशा सुखदेव

११५. मा.मोटे किरण बाळासाहेब

११६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११७. मा.संजय केशवराव काटे

११८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११९. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२०. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२१. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खोसे,मा.दंडवते,मा.माछरे,मा.दुरगुडे, मा.आष्टीकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.पाटील-प्राचार्य,औदयोगिक प्रशिक्षण केंद्र, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.पठाण, मा.लडकत,मा.पिरजादे,मा.बरशेट्टी,मा.ओंभासे,मा.शेख,मा.गायकवाड,मा.भोसले-कार्यकारी अभियंता,मा.बोदाडे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) बोपखेल येथे मुळा नदीवर पूल बांधणेच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ९९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला

असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

२) पिंपळे गुरव येथे बस टर्मिनल्स बांधणेच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ९९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.महापालिका सभा क्रमांक-५८ दिनांक २०/४/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नंदा ताकवणे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८८१ विषय क्रमांक-१
दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१५/कावि/३०५/२०१६ दि.२०/५/२०१६
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६३३९ दि.३१/०५/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वर्ग १ ते वर्ग ४ चे अधिकारी/कर्मचारी यांना सन १९७९-८० पासून शासन निर्णयाच्या आधारे महानगरपालिका ठराव व स्विकृत धोरणानुसार घरबांधणी, भुखंड, घरदुरुस्ती, घरविस्तार अग्रिम दिले जात आहे. सद्यस्थितीत शासन निर्णय क्रमांक घबांअ-१०.११ प्र.क्र.५६/२०११, विनियम मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.२७ फेब्रुवारी २०१२ अन्वये तसेच मनपा धोरणानुसार घरबांधणी अग्रिमासंदर्भात खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे व त्यानुसार घरबांधणी व इतर अग्रिम मंजूर केले जाते.

| अ.क्र. | अग्रिमाचा तपशिल | मनपा धोरण | कमाल मर्यादा र.रु. |
|---|---|---|---|
| १. | तयार घर खरेदी करणे (नवीन घरबांधणी अग्रिम) | मुळ पगार+ ग्रेड पे+ महा.भत्ता यांचे १०० पट | २५,००,०००/- |
| २. | घरविस्तार अग्रिम | मुळ पगार+ ग्रेड पे+ महा.भत्ता यांचे ५० पट | ४,००,०००/- |
| ३. | घरदुरुस्ती अग्रिम | मुळ पगार+ ग्रेड पे+ महा.भत्ता | २,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यांचे ५० पट | |
| ४. | भुखंड खरेदी अग्रिम | मुळ पगार+ ग्रेड पे+ महा.भत्ता यांचे ५० पट | ४,००,०००/- |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक घबां अ-२०१२/ प्र.क्र.३०/२०१२/ विनियम मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक. २० फेब्रुवारी २०१५ अन्वये घराच्या किंमत मर्यादेत सुधारणा करणेत आली आहे. सदर शासन निर्णय व यापूर्वीचे मनपाचे धोरण विचारात घेऊन खालीलप्रमाणे घरबांधणी व इतर अग्रिम मंजूरीचे धोरणात सुधारणा करणे आवश्यक वाटते.

शासन निर्णय.-

१) घरबांधणी अग्रिमाची कमाल मर्यादा.-

घरबांधणी विषयक विविध प्रयोजनांसाठी मनपा कर्मचा-यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याकरीता सहाव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतन (वेतन बॅड मधील वेतन + ग्रेड वेतन) विचारात घेण्यात यावे. अशा वेतनावर आधारीत घरबांधणी अग्रिम मंजूरीकरीता महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाच्या क्र.घभाभ-१००१/प्र.क्र. ६७/सेवा-५, दि. २४ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या एक्स वाय व त्याव्यतिरिक्त उर्वरीत वर्गीकरणातील शहरामध्ये घर/सदनिका/ जमीन खरेदीसाठी सुधारीत कमाल मर्यादा पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे. व सदरच्या निर्णयामध्ये वित्त विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक.घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक.२९ फेब्रुवारी २०१६ अन्वये दि.२४ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयातील तरतुदीमधून सूट देऊन पुणे (नागरी समुह) याकरीता “एक्स” वर्गीकरणात या आदेशान्वये अंतर्भाव करण्यात आलेला आहे. त्यानुसार सुधारीत वेतनबॅड मधील वेतन (मुळ वेतन + ग्रेड वेतन) विचारात घेऊन घरबांधणी अग्रिम रकमेत तसेच घराच्या किंमत मर्यादेत खाली नमुद केलेप्रमाणे सुधारणा केली आहे.

| अ.क्र | अग्रिमाचा तपशिल | घरबांधणी अग्रिमाच्या रकमेची कमाल मर्यादा |
|---|---|---|
| | | "एक्स" वर्गीकरण |
| अ) | १) जमीन खरेदी करुन त्यावर विहित कालावधीत घर बांधणे किंवा<br>२) स्वत:च्या मालकीच्या जागेवर नवीन घर बांधणे,किंवा<br>३) स्वत:च्या मालकीच्या जागेवरील मोडकळीस आलेले घर पाडून नवीन घर बांधणे,किंवा<br>४) बांधकाम चालू असलेले नवीन घर किंवा तयार नवीन घर खरेदी करणे.(घरबांधणी अग्रिम) | मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ब) | घर बांधण्यासाठी जमीन खरेदी करणे. ( भुखंड खरेदी अग्रिम ) | मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.१५.०० लक्ष किंवा जमिनीची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| क) | स्वत:च्या मालकीच्या राहत्या घराचे नवीन बांधकाम करुन विस्तार करणे. ( घरविस्तार अग्रिम ) | मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.१५.०० लक्ष किंवा बांधकामाची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| ड) | सध्याचे राहते घर निवास योग्य करण्यासाठी घरदुरुस्ती अग्रिम (राहत्या घरात नवीन सोयी किंवा अंतर्गत सजावट करणे यासाठी अनुज्ञेय नाही ) | मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) १०० पट किंवा रु.७.५० लक्ष किंवा घरदुरुस्तीचा खर्च किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| इ) | हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन (H.D.F.C.), राष्ट्रीयकृत बॅंका/सहकारी बॅंका,महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशन व तत्सम शासन मान्य वित्तीय | कर्मचा-याने वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम वजा अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेपर्यंत कर्मचा-याने संस्थेला परतफेड केलेली रक्कम किंवा |

| | | |
|---|---|---|
| | संस्थाकडून घर बांधणीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी | अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला वित्तीय संस्थेला परतफेड करण्यासाठी बाकी राहिलेली रक्कम किंवा मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| फ) | जुने घर विकत घेण्यासाठी अग्रिम | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी (AuthorisedValuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत किंवा मूळ वेतनाच्या (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) २०० पट किंवा रु.५०.०० लक्ष किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |

२) घरबांधणी अग्रिम मंजुरीसाठी घरांची किंमत मर्यादा.-

वित्त विभागाच्या क्र.घभाभ-१००१/प्र.क्र३६७/सेवा-५ दि.२४ ऑगस्ट,२००९ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या “एक्स” व “वाय” या वर्गीकरणातील शहरामध्ये नवीन बांधावयाच्या किंवा विकत घ्यावयाच्या तयार नवीन घराची/जुन्या घराची किंमत मर्यादा(जमीनीची किंमत वगळून)कमाल र.रु.२.०० कोटी व त्याव्यतिरिक्त अन्य ठिकाणांकरीता कमाल रु.१.०० कोटी अशी विहित करण्यात आली आहे.

३) घरबांधणी अग्रिमाची वसुली.-

अ) घरबांधणी अग्रिमाची वसुली.-

अग्रीमाची व्याजासह वसूली सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल अशा पध्दतीने वरील अ,इ आणि फ येथील प्रयोजनाकरीता कमाल २० वर्षात प्रथम १९२ मासिक हप्त्यात मूळ अग्रिम व नंतर ४८ मासिक हप्त्यात व्याज वसूल करण्यात यावे ब, क आणि ड येथील प्रयोजनासाठी घेतलेल्या अग्रिमाची वसूली व्याजासह कमाल

९६ मासिक हप्त्यात प्रथम ७२ मासिक हप्त्यात मूळ अग्रिम व नंतर २४ मासिक हप्त्यात व्याजाची रक्कम वसूल करण्यात यावी. अग्रिम धारक त्याच्या इच्छेनुसार कमी कालावधीत अग्रिम व व्याजाची रक्कम फेडण्यासाठी मासिक हप्त्याची रक्कम वाढवू शकेल.

ब) घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकरकमी मंजूर केली असल्यास अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाची रक्कम वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात येईल.घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकापेक्षा अधिक हप्त्यात मंजूर केली असल्यास अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाचा प्रथम हप्ता वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात येईल.

४) एक अर्जदार मनपा कर्मचारी व प्रकरणपरत्वे त्याच्या/तिच्या पत्नीच्या/पतीच्या संयुक्त नावावर घर/जमीन खरेदी करावयाचे असल्यास शासन अधिसूचना क्र.एचबीए१०७१/२१४३/७१/फ-१, दि.१/१/१९७२ मधील तरतुदीनुसार त्यातील अटी व शर्तीच्या अधीन अग्रिम मंजूर करता येईल.

५) मनपा अधिकारी/कर्मचा-यास घर खरेदी/बांधकाम करण्यास सहाय्यभूत व्हावे यासाठी शासन निर्णय क्र.एचबीए १०८३/सीआर४६५/जीईएन ५, दि.१३/०६/१९८४ मधील परि.३ मधील घराचा व्दितीय प्रभार स्विकारण्याबाबतच्या अटीत पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.सदर शासन निर्णयातील अन्य अटी व शर्तीच्या अधीन राहून,सदर घर/सदनिका यावर वित्तीय संस्थेचे कर्ज व मनपा अग्रिम यांच्या टक्केवारीच्या प्रमाणानुसार प्रभार निर्माण करुन इतर वित्तीय संस्थाकडून कर्ज उभारता येईल. कोणत्याही परिस्थितीत मनपा अग्रिम रक्कम मंजूर केलेल्या प्रमाणाच्या टक्केवारीपेक्षा कमी प्रभार स्विकारणार नाही. मनपा व वित्तीय संस्था या दोन्हीचा मिळून येणारा प्रभार घराच्या किंमती इतका असावा.

६) खाजगी बांधकाम व्यवसायिक (बिल्डर) ठेकेदार, कंपनी, सिडको, हुडको, म्हाडा, शासनाने मंजूर केलेल्या कोटयातून, इत्यादीकडून तयार सदनिका अथवा बांधकाम सुरु असलेल्या इमारतीत सदनिका खरेदी करण्यासाठी मुंबई वित्तीय नियम,१९५९ मधील परिशिष्ट-२६ मधील तरतुदीनुसार प्रकरणपरत्वे एक किंवा एका पेक्षा जास्त हप्त्यात अग्रिम अनुज्ञेय राहील.

७) मनपा सेवेतील पुनर्नियुक्त माजी सैनिक असलेल्या कर्मचा-याला संदर्भाधीन शासन निर्णय क्र.अग्रिम-१०९६/प्र.क्र.४/९६/विनियम, दि.२३/०६/१९९७ मधील तरतुदी नुसार अग्रिम अनुज्ञेय राहील.

८) अग्रिम मंजूरीसाठी पुढीलप्रमाणे अटी लागू राहतील.-

१) महापालिका ठराव क्र.५९८,दिनांक २०/११/२०१४ नुसार परिपत्रक क्रमांक प्रशा/१५/कावि/६५/२०१५, दिनांक.०३/०२/२०१५ अन्वये महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांची नियमित वेतनश्रेणीत सलग ०२ वर्ष सेवा पुर्ण झाली असली पाहिजे. त्याचप्रमाणे अग्रिम मंजूर करतेवेळी मनपा अधिकारी/कर्मचारी यांचा उर्वरीत सेवाकालावधी किमान ५ वर्ष शिल्लक असणे अनिवार्य आहे.

२) वरील सर्व प्रयोजनार्थ संपूर्ण सेवेमध्ये फक्त एकदाच अग्रिम अनुज्ञेय होईल. मात्र मनपाकडून अग्रिम घेऊन बांधलेल्या/खरेदी केलेल्या घराच्या नैसर्गिक आपत्तीतून उदभवलेल्या दुरुस्ती करता पहिल्यांदा ५० पटीपेक्षा कमी पटीत मनपा अधिकारी/कर्मचा-यास घरबांधणी अग्रिम मंजूर केला असेल त्यांना २०० पट वजा आधी मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रिमाची पट यातील फरकाच्या पटीत दुस-यांदा अग्रिम अनुज्ञेय होईल. सदर अग्रिमाची रक्कम फरकाच्या पटीतील रक्कम किंवा घराची किंमत किंवा र.रु.१५ लक्ष यापैकी कमी असेल ती रक्कम अनुज्ञेय राहील.

३) महापालिका ठराव क्र.७९८ दि. २५/०१/२०१६ नुसार परिपत्रक क्र.प्रशा/१५ /कावि/८७/२०१६ दि.२९/०४/२०१६ अन्वये नोंदणीकृत इक्वीटेबल मॉर्गेज (नोटीस ऑफ इंटीमेशन रिगार्डींग मॉर्गेज बाय डिपॉझिट ऑफ टायटल डीड) करणे अनिवार्य आहे.

४) घराच्या किंमतीइतका घराचा विमा, शासकीय विमा संचालनालयाकडे उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहील याची संबंधित अग्रिम धारकाने दक्षता घ्यावी.

५) पती, पत्नी दोघेही मनपा कर्मचारी असले तरीही त्यापैकी एकालाच (विहीत मर्यादेत) घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील.

६) वरील सर्व प्रयोजनार्थ घेण्यात येणा-या अग्रिमाकरिता घर/जमीन अर्जदाराच्या स्वताच्या नावावर असणे आवश्यक राहील. तसेच महापालिका

ठराव क्र.५९८, दिनांक २०/११/२०१४ नुसार परिपत्रक क्रमांक प्रशा/१५/कावि/६५/२०१५, दिनांक.०३/०२/२०१५ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीपासून २० कि. मी. अतंरापर्यत घर/फलॅट खरेदीसाठी घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील.

७) दि.१ मे, २००१ रोजी किंवा त्यानंतर दोन पेक्षा अधिक अपत्ये असणा-या अर्जदारास (दुस-या वेळेस जुळया अपत्यांचा अपवाद वगळता) या अग्रिमाचा लाभ घेता येणार नाही.

८) अग्रिम मंजूरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे अग्रिमाची वसूली पूर्ण झाल्यानंतर या दोन्हीबाबीची नोंद सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

९) मनपा अधिकारी/कर्मचारी, यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करताना, त्याच्या शिल्लक घरबांधणी अग्रिम मुददल व व्याजाची वसूली, त्या अधिकारी/कर्मचारी याच्या सेवानिवृत्ती उपदान अथवा परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून वसूल करण्यासंदर्भात संमती पत्र देणे आवश्यक असेल. सदर संमतीपत्र घेण्याची जबाबदारी अग्रिम मंजूर करणा-या आधिका-याची राहील.

१०) मनपा सेवेत असताना अग्रिम धारकाचा मृत्यु झाल्यास, त्याच्या मृत्युच्या दिनांकास शिल्लक असलेल्या व्याजाच्या रकमेची वसुली प्रशासकीय विभागाने सोडून दयावी. मृत्युच्या दिनांकाला शिल्लक असलेल्या मुददलाची पूर्ण रक्कम त्यांच्या मृत्यु-नि-सेवा उपदान/परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून समायोजित करण्यात यावी. त्यापेक्षा जास्त रक्कम शिल्लक राहिल्यास रु. १.०० लक्ष पर्यतचीच रक्कम क्षमापित करता येईल व ती रक्कम क्षमापित करण्यास संबंधित प्रशासकीय विभाग सक्षम राहील. त्यानंतरही मनपा अधिकारी/कर्मचा-याकडून घरबांधणी अग्रिम वसूल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित कर्मचा-याच्या वारसाकडून अथवा वारसदारास अनुकंपा तत्वावर मनपा सेवेत नियुक्त केल्यास त्याच्याकडून शिल्लक रकमेची वसूली करावी. अन्यथा अशा कर्मचा-याचे घर/सदनिका मनपाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिका-याने सदर घर/सदनिका लिलाव करुन त्या रकमेतून वसूली करावी. तसेच लाड कमिटीचे शिफारशीनुसार होणा-या वारस नियुक्ती वेळेस कर्मचा-याने घेतलेल्या घरबांधणी अग्रिम मुददल व व्याजाची पुर्ण रक्कम

त्यांच्या मृत्यु - नि-सेवा उपदान/ परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून समायोजित करण्यात यावी. परंतू त्यानंतरही काही रक्कम शिल्लक राहिल्यास त्यांचे वारसाकडून वसूल करण्यात यावी.

११) घरबांधणी अग्रिमधारकास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९, मधील नियम क्र.८ नुसार मनपा सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केल्यास/बडतर्फ केल्यास अथवा सेवेतून काढून टाकले असल्यास सक्तीने सेवानिवृत्तीच्या/बडतर्फीच्या/सेवेतून काढून टाकल्याच्या दिनांकास त्यास देय असलेल्या मनपाचे रकमामधून, वसूल करावयाची शिल्लक घरबांधणी अग्रिमाची संपूर्ण रक्कम व शिल्लक व्याजाची संपूर्ण रक्कम वसूल करण्यात यावी. यानंतरही मनपा अधिकारी/कर्मचा-याकडून घरबांधणी अग्रिम अथवा व्याजाची रक्कम वसूल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित अधिकारी/कर्मचा-याने शिल्लक रक्कम मनपास त्वरीत एकरकमी भरणा करावी अन्यथा अशा कर्मचा-याचे घर/सदनिका मनपाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिका-याने सदर घर/सदनिका लिलाव करुन त्या रकमेतून वसूली करावी.

१२) घरबांधणी अग्रिम रकमेच्या नियमित व योग्य वसूलीसाठी अर्जदार स्वत: जबाबदार राहील.

१३) अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला, अन्य विभाग/कार्यालयात बदली झाली तरीही घरबांधणी अग्रिम तसेच मनपाकडील इतर अन्य अग्रिमाची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रिमधारक स्वत: जबाबदार राहील.

१४) मनपा अधिकारी/कर्मचा-यांना मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे त्या कारणाकरीता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यास कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसूरदाराकडून अग्रिमाची रक्कम,प्रचलित व्याजदर+२.७५ टक्के दंडनीय व्याजासह एकरकमी वसूल करण्यात यावी.

१५) प्रशासन विभागाकडील घरबांधणी अग्रिम लेखाशिर्षावर अंदाजपत्रकीय तरतुद उपलब्ध असली पाहिजे.

१६) मनपा कर्मचा-यास मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रिमाच्या प्रथम हस्याची रक्कम वितरीत केल्यानंतर संबंधित कर्मचा-याने कोणत्याही कारणास्तव पुढील अग्रिम न घेता प्रथम हस्यात घेतलेल्या अग्रिमाची रक्कम परत करुन अग्रिम रदद केल्यास अग्रिम मंजूरीच्या दिनांकास प्रचलित असलेल्या व्याजदराने गणना करुन रक्कम परतीच्या दिनांकापर्यंतच्या व्याजाची वसूली करण्यात यावी.तसेच,सदर अधिकारी/कर्मचारी यांना पुन्हा घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात येऊ नये.

१७) प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचा-यांना अग्रिम मंजूरीसंदर्भात वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.एफएनआर १०७०/२०७६/एफ-१ दि.९ मे,१९७२ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

१८) वेतनातून करावयाच्या सर्व वजावटी आणि मागणी केलेल्या अग्रिम रकमेच्या संभाव्य हस्याची रक्कम वजा जाता शिल्लक राहणारी निव्वळ वेतनाची रक्कम ही वेतन प्रदान अधिनियम १९३६ नुसार देय असणा-या वेतनाच्या रकमेपेक्षा कमी असता कामा नये.

९) अग्रिम परतफेडीच्या क्षमतेची परिगणना पुढीलप्रमाणे करण्यात यावी.

| अ.क्र. | राहिलेल्या शासन सेवेची मर्यादा | परतफेडीची क्षमता |
|---|---|---|
| १. | २० वर्षानंतर सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत | मूळ मासिक(वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) वेतनाच्या ८५ टक्के |
| २. | १० वर्षानंतर परंतू २० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत. | मूळ मासिक (वेतन बॅंड मधील वेतन+ग्रेड वेतन) वेतनाच्या १०० टक्के |
| ३. | १० वर्षाच्या आत सेवानिवृत्त होणा-या तथापि सेवानिवृत्तीसाठी किमान ५ वर्षे सेवा कालावधी शिल्लक असणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत | मूळ मासिक (वेतन बॅंड मधील वेतन + ग्रेड वेतन) वेतनाच्या १०० टक्के |

१०) व्याज दराबाबत अन्य आदेश निर्गमित होईपर्यंत या आदेशान्वये मंजूर करण्यात येणा-या घरबांधणी अग्रिमातील रु १५.०० लक्ष पर्यंतच्या रकमेवरील व्याजाची परिगणना शासन निर्णय, घबांअ(व्याजदर)-१०१२/प्र.क्र.७/२०१२/विनियम,दि.१० मे,२०१२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या ९.५० टक्के या दराने व त्यावरील रकमेवरील व्याजाची परिगणना (९.५०+२.००) टक्के

म्हणजेच ११.५० टक्के या दराने करण्यात यावी.ज्या आर्थिक वर्षात घरबांधणी अग्रिम मंजूर केले असेल त्या आर्थिक वर्षासाठी जो व्याजदर लागू करण्यात आला असेल त्या दराने व्याजाची परिगणना करण्यात यावी. व्याजाची परिगणना वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अग्रिम-१०९९/प्र.क्र.४९/९९/विनियम, दि.५ मे, २००० मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने करण्यात यावी.

११) यापूर्वी मंजूर करण्यात घरबांधणी अग्रिमाची प्रकरणे पुन्हा नव्याने उघडण्यात येणार नसल्याने वाढीव घरबांधणी अग्रिम मंजूर केले जाणार नाही.

सबब शासन निर्णयात व मनपा धोरणात नमुद केल्यानुसार उपरोक्त घरबांधणी व इतर अग्रिमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.स्वाती साने-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-२

दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/२२/२०१६ दि.२३/०५/२०१६

२) मा.स्थायी समीतीकडील ठ.क्र.१६३८४ दि७/६/२०१६

राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी करणेअंतर्गत महाराष्ट्र शासनाचे उपसचिव नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०८/०६/२०१२ चे पत्रान्वये राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी सुरु करणेत आलेली आहे. त्यावेळी मा.शहर फेरीवाला समितीची बैठक दि. ०५/०४/२०१३ नुसार फेरीवाल्यांची नोंदणी फी, विक्रेता फी, नुतनीकरण फी, देखभाल फी आणि दंड ठरविणेत आले आहे. नोंदणी फीचे दर र.रु. १०००/- प्रमाणे ठरविणेत आले होते यास मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ३३८२ दि. २१/०५/२०१३ व मा.महापालिका सभा ठराव क्रं.२९८ दि. २७/०६/२०१३ अन्वये मान्यता देणेत आली आहे. व आदेश क्रं.

भूजि/१/कावि/३५७/२०१३ दि. १३/०९/२०१३ अन्वये आदेश निर्गत केलेले आहेत. प्रस्तुत आदेशान्वये ठरविणेत आलेले दर जादा असल्याने सदर दर कमी करणेबाबत फेरीवाला संघटना वारंवार मागणी करीत आहेत. तसेच दि. ३०/०१/२०१६ च्या शहर फेरीवाला समितीचे सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार पुणे मनपाकडील नोंदणी फी र.रु.२००/- प्रमाणे शहरातील फेरीवाल्यांची बायोमेट्रीक नोंदणी करणेकामी नोंदणी फी र.रु.२००/- व ओळखपत्र फी र.रु.२००/- करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, या विषयाची माहिती द्यावी.

**मा.आष्टिकर(सहा.आयुक्त,भूमि आणि जिंदगी)–**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी करणेअंतर्गत मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ३३८२ दि.२१/०५/२०१३ व मा.महापालिका सभा ठराव क्रं.२९८ दि.२७/०६/२०१३ अन्वये नोंदणी फीचे दर प्रती फेरीवाला र.रु.१०००/- करणेस मान्यता देणेत आली आहे. शहर फेरीवाला समितीचे दि.३०/०१/२०१६ च्या सभेमध्ये झालेल्या ठरावानुसार नोंदणी फी र.रु.२००/- करण्यासाठी हा प्रस्ताव मा.महापालिका सभेपुढे सादर करण्यात आला आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आत्ताच याठिकाणी या विषयासंदर्भात जी माहिती दिली आहे. मला पहिली ही माहिती हवी आहे की, दि. ३०/०१/२०१६ च्या शहर फेरीवाला समितीचे सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार पुणे मनपाप्रमाणे नोंदणी फी र.रु.१,०००/- ऐवजी र.रु.२००/- घ्यावी असे म्हटले आहे. मला हे सांगावे की, आपल्या महानगरपालिकेत किती फेरीवाल्यांची नोंद केली आहे. आत्तापर्यंत त्यांच्याकडून किती पैसे वसूल केले आहेत. पूर्वी आपल्याकडे शासनाच्या काही टप-या होत्या. त्या टप-यांकडून काही पैसे, काही शुल्क घेत होतो. ते सुद्धा बंद करुन किती वर्षे झाली आहेत. आपण पूर्वी फेरीवाल्यांना पिंपरी चिंचवडचा हिरव्या रंगाचा एक बिल्ला देत होतो. त्या बिल्याच्या अनुषंगाने त्याची नोंद होत होती. आणि त्याप्रमाणे पैसे वसूल होत होते. माझ्या माहितीप्रमाणे हे सर्वकाही गेले १२ वर्षांपासून बंद आहे. सबंध शहरात फेरीवाल्यांचा सुळसुळाट झालेला आहे. असे पैसे घेऊन त्यांना ऑथोराईज करायचे काम पहिले बंद करा. सर्व रस्ते बंद करा, सर्व चौक बंद करा आणि सर्व शहर बकाल करा. अशाप्रकारचे धोरण आहे का. महापालिकेवर दोनशे रुपये गोळा करायची वेळ आली आहे का. या विषयामागे प्रशासनाचा नेमका हेतू काय आहे. शासनाने विषय पाठवला म्हणून हा विषय सभेपुढे ठेवला आहे का, त्या शहर फेरीवाला समितीने मागणी केली म्हणून हा विषय ठेवला आहे का. शासनाचा किंवा प्रशासनाचा या

शहराकडे बघायचा दृष्टिकोण काय आहे. आपण कोट्यावधी रुपये खर्च करतोय. हा सर्व खर्च करत असताना नगरसेवकांची हॉकर झोन तयार करा अशी मागणी असताना सुद्धा हॉकर झोन तयार होत नाहीत. मग बेकायदेशीर टप-या लागतात. फेरीवाले गाड्या लावतात. आतातर लोकांनी एक नवीन उद्योग सुरु केला आहे की, थ्रीव्हिलर, फोरव्हिलर गाडीत सामान आणतात. त्यांना वाटेल त्या चौकात त्यांचे दुकान थाटतात. त्यांना वाटेल तिथे जातात. त्यामुळे रस्त्यात अडचण होते. ऍक्सिडंट होतात. मग दूर्दैवाने सांगावे लागते, महापालिका यांच्याकडून एक रुपया सुद्धा घेत नाही. मी बोललोतरी अधिका-यांना वाटणार नाही. मग अधिकारी कारवाई करण्यासाठी त्याच-त्याच फळवाल्यांना घेऊन जातात. तेच-तेच पैसे गोळा करतात. काही ठिकाणी स्कॉड ठेवलेला आहे. तो स्कॉडसुद्धा काही काम करत नाही. स्वतः नगरसेवकांनी तक्रार करुनसुद्धा कुठेही कारवाई होत नाही. अशी परिस्थिती असताना महापालिकेला हा नवीन कोणता धंदा सुरु करायचे सुचले आहे. हा विषय ठेवायचा हेतू काय आहे. तुमचे धोरण काय असणार आहे याचा पहिल्यांदा खुलासा व्हावा. त्यानंतर आमच्याकडून मान्यता घ्या. धन्यवाद.

**मा.आष्टिकर(सहा.आयुक्त,भूमि आणि जिंदगी)**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आजचा जो विषय आहे तो राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार मा.सर्वोच्च न्यायालयाचे जे निर्देश आहेत. त्या धोरणानुसार आपल्या फेरीवाल्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. या नोंदणीमध्ये जे पात्र फेरीवाले आहेत, त्यांना सुरुवातीला आपल्याला फेरीवाला प्रमाणपत्र द्यायचे आहे. त्यासाठीच जी ही काही फी आहे, ती फी या मा.महासभेने दि.२७ जून २०१३ला ठरवली होती. ती कमी करण्यासाठी हा मूळ विषय आहे. आजरोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे एकूण ८८९० पात्र फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झाले आहे. त्यात बायोमेट्रिक झालेल्या फेरीवाल्यांची संख्या ५८३५ आहे. यांना प्रमाणपत्रप्राप्त फेरीवाला म्हणून प्रमाणपत्र द्यायचे आहे. ते छापून सुद्धा तयार झाले आहे. ही फी कमी करण्यासाठी हा प्रस्ताव सादर केला आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे** – यात फेरीवाला याचे निकष काय आहेत. टप-यांना पण फेरीवाला म्हटले आहे का.

**मा.आष्टिकर(सहा.आयुक्त,भूमि आणि जिंदगी)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, पात्र फेरीवाल्यांचे जे निकष होते, त्याअनुसार फेरीवाल्यांची बायोमेट्रीक झाली आहे. पात्र फेरीवाल्यांचे पुनर्वसन सहा प्रभागांत करायचे आहे. याअनुषंगाने सहा प्रभागांमध्ये २४६ फेरीवाला झोन, हॉकर झोनचे आयडेंटीफीकेशन झाले आहे. या २४३ ठिकाणी सहा प्रभागांत यांची नोंदणी झाल्यानंतर नोंदणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर प्रभाग स्तरावर कार्यवाही होणार आहे. हे पुनर्वसन झाल्यानंतर अनधिकृत फेरीवाले यांचे सुद्धा निर्मूलन प्रभाग स्तरावर करण्याची कारवाई केली जाईल. ८८९० पात्र फेरीवाले आहेत.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - पात्र कशावरुन व अपात्र कशावरुन याचे काय निकष आहेत ते पण सांगा.

**मा.आष्टिकर(सहा.आयुक्त,भूमि आणि जिंदगी)-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, त्याचे निकष आहेत. त्या निकषांनुसार २०१३ मध्ये सर्व्हे झाला आहे. यात ते पिंपरी चिंचवडमधील रहिवासी आहेत का, किती वर्षांपासून व्यवसाय करत आहेत, या सर्व बाबींची खात्री करुन घेऊन हा सर्व्हे झालेला आहे. त्याअनुषंगाने या ८८९० जणांना पात्र केले आहेत. या पात्र फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्यासाठी जे २४६ हॉकर झोन तयार केले आहेत. तिथे त्यांचे पुनर्वसन करणार आहोत.

**मा.मंगलाताई कदम**-फेरीवाले म्हणजे काय होते. रस्त्याने फिरणारे त्यांना फेरीवाले म्हणतात. तुम्ही म्हणताय जिथे हॉकर झोन निर्माण केला आहे तिथे त्यांचे पुनर्वसन करणार. मग तुम्ही मला हे सांगा की, तरीसुद्धा फेरीवाले रस्त्याने फिरणार नाहीत का.

**मा.आष्टिकर(सहा.आयुक्त,भूमि आणि जिंदगी)-**यात दोन प्रकारचे फेरीवाले आहेत. स्थिर फेरीवाला आणि फिरता फेरीवाला. जे स्थिर फेरीवाले आहेत त्यांचेच पुनर्वसन या २४६ ठिकाणी करणार आहोत. फिरता फेरीवाल्यांचे नियम वेगळे आहेत. त्यांना फिरता फेरीवाल्याचे प्रमाणपत्र मिळणार आहे. त्याप्रमाणे ते फिरुन व्यवसाय करु शकणार आहेत.

**मा.मंगलाताई कदम**-साहेब, तुमची कुठेतरी गल्लत होते आहे. मुळात म्हणजे शहरात असणा-या टप-या. टपरीधारकांना तुम्ही हॉकर झोनमध्ये हलवणार आहात का फेरीवाल्यांना हॉकरझोनमध्ये हलवणार आहात.

**मा.आष्टिकर(सहा.आयुक्त,भूमि आणि जिंदगी)-**जे पात्र फेरीवाले आहेत त्यांचे पुनर्वसन या २४६ मध्ये होणार आहे.

**मा.मंगलाताई कदम**-साहेब,तुम्ही फेरीवाल्यांचे पण म्हणता, टपरीवाल्यांचे पण म्हणता.

**मा.आष्टिकर(सहा.आयुक्त,भूमि आणि जिंदगी)-**फेरीवाल्यात दोन प्रकार आहेत. एक स्थिर फेरीवाला व एक फिरता फेरीवाला.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब, मा.अष्टेकर साहेब, तुम्ही मला सांगा की तो हातगाडी घेऊन एका जागेवर उभा राहणार आहे का. याला स्थिर फेरीवाला म्हणणार का.

**मा.आष्टिकर(सहा.आयुक्त,भूमि आणि जिंदगी)-** हातगाडी घेऊन बसणारा हा फिरता फेरीवाला असणार आहे.

**मा.मंगलाताई कदम**- मा.अष्टेकर साहेब, आम्हाला समजत नाहीय का तुम्हाला समजत नाहीय.

**मा.आष्टिकर(सहा.आयुक्त,भूमि आणि जिंदगी)-**जो एका ठिकाणी स्थिर बसून व्यवसाय करणार नाही तो फिरता फेरीवाला असणार आहे. आणि जो एका ठिकाणी बसून स्थिर व्यवसाय करणार तो स्थिर फेरीवाला असणार आहे.

**मा.मंगलाताई कदम**- मा.महापौर साहेब, हा विषय तहकूब करावा.

**मा.सुरेश म्हेत्रे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, यात जो स्थिर फेरीवाला आहे. आम्हाला प्रभाग समितीच्या बैठकीत असे सांगितले होते की, १x१ मी.ची जागा आहे त्याला स्थिर फेरीवाला म्हणतात. तो टपरीवाला नाही. आपण १x१ मी. च्या टप-या देणार आहोत का. एवढ्या छोट्या टप-या नसतात. फूटपाथवर जागा आखून दिल्यातर तो या १x१ मी. च्या जागेवर भाजी ठेवणार का स्वतः बसणार. हा विषय प्रभाग स्तरावर अनेक वेळा चर्चीला आहे. फेरीवाले हातगाडी घेऊन फिरणारच आहेत आणि हे बैठे राहणार आहेत. त्यांची संख्या फेरीवाला संघटनेने दिली आहे. त्यावर हरकत येते आहे की, त्यांनी त्यांच्या मनाप्रमाणे संख्या वाढवली आहे. त्या रस्त्याला किती हातगाडीवाले पाहिजेत, त्याचे नियम आहेत. चौकापासून १०० मी.चा रस्ता असेलतर सुप्रिम कोर्टाने त्यात कंडीशन घातली आहे. त्याप्रमाणे डिपी केला आहे. हे सभागृहाने क्लिअर सांगितले पाहिजे. हे फेरीवाले आमच्या वॉर्डमध्ये राहत नसून दुस-या वॉर्डातून इथे येऊन काही जणांनी फॉर्म भरला. आमच्या वॉर्डातल्या काहींना हे माहितच नाही. त्याकरिता परत फॉर्म भरुन घ्यावेत. यांच्याकडे जे फॉर्म आहेत. त्यात इतर वॉर्डातली नावे आहेत. प्रभाग स्तरावर आपण बदल करु. ज्यावेळी सभागृहात विषय येईल त्यावेळी तुम्ही पाहिजे तो बदल करु शकता. ही जागा १x१ मी. आहे, ती फार चुकीची आहे. ही संख्या वाढवायचा हक्क फेरीवाला संघटनेला दिला आहे. फी कमी करुन आत्ताच रस्त्याचे रुंदीकरण केले त्याचा काय उपयोग होणार. सर्वांशी चर्चा करुन त्याचे निश्चित धोरण केले पाहिजे. त्याला नंतर अंतिम स्वरुप द्या. हा विषय तहकूब करण्यात यावा. धन्यवाद.

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, फेरीवाला धोरण व एक हजार ऐवजी दोनशे रुपये फी घेणे असा विषय मा.महापालिका सभेसमोर आला आहे. आत्ता मा.अष्टेकर साहेबांनी काही गोष्टी थोड्या चुकीच्या सांगितल्या आहेत. माझे म्हणणे आहे की, शहरात ज्या-ज्या ठिकाणी हॉकर झोन म्हटले गेले तिथे सर्वे झाला आहे. बरेच वर्षापासून हा प्रस्ताव धूळ खात पडला आहे. तो देणे बंधनकारक आहे. तो देत असताना फेरीवाला धोरणाचा विषय आपण म्हणतोय तो नगरसेवकांच्या लक्षात चुकीचा येतो आहे. मा.अष्टिकर साहेब म्हणतात, ज्या गाड्यांना, दुकानांना चाके आहेत, ते फेरीवाले. जे फिरता व्यवसाय करणारे ते फिरते फेरीवाले.

**मा.आष्टिकर(सहा.आयुक्त,भूमि आणि जिंदगी)-** यात दोन प्रकार आहेत. स्थिर,बैठा व्यवसाय करणारे व फिरता व्यवसाय करणारे.

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, ज्या दुकानांना, टप-यांना चाके लावली आहेत. आज तुम्हाला सांगतो, सगळ्यांचा विरोध कशासाठी होतो. शहरात काही भाजीवाले फिरता व्यवसाय करतात, याबद्दल दुमत नाही. काही महिलांना गृहोपयोगी वस्तू लागतात, त्याचा फिरुन व्यवसाय करतात, त्याबद्दल दुमत नाही. पण काहींचा व्यवसाय असा आहे की, फेरीवाल्यांची मंजूरी घेतात व एकाच ठिकाणी गाड्या उभ्या करुन रस्ता पॅक करतात हे चुकीचे आहे. आज भक्ती-शक्ती समोर जे लोक बसतात, ते संध्याकाळपासून रात्री ९.०० वाजेपर्यंत सगळे गाड्या घेऊन जातात. आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या समोरच्या बाजूला जी जागा आहे, तिथे प्राधिकरणाच्या जागेत फेरीवाला म्हणून तो पैसे भरतो. तिथे हातगाड्या कायमस्वरुपी आहेत. तिथे नारळाचे ढीगच्या ढीग पडून आहेत. तिथे ज्यूसचा व्यवसाय चालला आहे. आधी तो भैय्या तिथे एकटा होता. नंतर त्याने तिथे त्याच्या नातेवाईकांचे आणखी दहा/बारा लोक आणले. दूसरा विषय असा येतो की, आज हे बाहेरचे लोक हजार रुपये कायपण दहा हजार पण द्यायला तयार आहेत. आज त्या गोरगरीबांना सवलत द्यायला पाहिजे. ज्यांचे हातावर बोट आहे. ज्यांचे व्यवसाय बंद झाले आहेत. अतिक्रमण बांधकामे पाडल्यामुळे गवंड्याचे काम करणा-या हातांना रोजगार मिळत नाही. म्हणून ते हातगाडीवर फिरून व्यवसाय करत आहेत. त्यांना शंभर टक्के व्यवसाय करु दिला पाहिजे. त्यांच्या नावाखाली बाकीचे लोक, आपले अतिक्रमणवाले लोक आहेत, त्यांनी धंदा चालू केला आहे. त्यांची प्रॉपर्टी बघा. अधिका-यांकडे नसेल एवढी प्रॉपर्टी त्यांच्याकडे बघा. एका-एकाकडून महिना दीड/दोन हजार रुपयांची वसूली करतात. आपण कारवाई करायला सांगितली तर ते आपले नाव जाऊन सांगतात की, अमक्याने कारवाई करायला सांगितली आहे. मग तो सगळ्यांना घेऊन विरोधात घोषणा चालू करतो. जेव्हा आम्हाला सगळे शहर स्वच्छ

करायचे आहे. सगळ्या चांगल्या गोष्टी करायच्या आहेत. वॉर्डात अतिक्रमण वाढले नाही पाहिजे. या सगळ्या गोष्टी करत असताना साहेब, प्रशासन चुकते आहे. प्रशासनाने यावर लक्ष दिले पाहिजे. हॉकर झोनमध्ये जे लोक येतात, ते न्याय मागतात. त्यांना न्याय देत असताना चुकीचे लोक कमिशन घेतात. आपण हजार, दोन हजार ऐवजी पुण्याप्रमाणे करतोय ही चांगली गोष्ट आहे. हे केलेच पाहिजे याबाबत दुमत नाही. परंतू हे जे बाहेरून आलेले लोक पोट भरत आहेत. त्यांनी त्यांचे नातेवाईक पण इथे आणले आहेत. बाहेरून आलेला पण पोट भरायलाच इथे येतो हे मी मान्य करतो. पण यांनी इथे आख्खे खानदान आणून घुसखोरी करुन ठेवली आहे, याला माझा विरोध आहे. मा.आयुक्त साहेब, आपण याचा गांभिर्याने विचार केला पाहिजे. शहर विद्रूप होत चालले आहे या मताशी मी सहमत आहे. सर्व सदस्य विरोध करतात. कारण वसूलीच्या नावाखाली जो काही बिझनेस चालला आहे तो थांबवला पाहिजे. लोकांच्या गाड्या आहेत त्या भाड्याने दिल्या आहेत. दहा हजार, वीस हजार रुपये भाडे आहे. या धोरणातून यांच्यावर कारवाई करा. झोपडपट्टीतील गोरगरीब असेल त्याला सवलत दिली पाहिजे. उपसूचनेसहित कारवाई करा. जो १० वर्षांपासून पिंपरी चिंचवडचा रहिवासी असेल तर त्याला मंजूरी द्या. धन्यवाद.

**मा.संजय (नाना) काटे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, राष्ट्रीय फेरीवाला धोरण हा विषय आहे. याकरिता मला एक/दोन प्रश्न विचारायचे आहेत. आत्ताच मा.सुरेश म्हेत्रे यांनी सांगितले, आपण एक मीटरची जागा देणार आहोत. हातगाडीवरुन व्यवसाय करतात. आत्ता मा.तानाजी खाडे यांनी विचारले की, गाडीला चाके लावली आहेत का. टप-यांचा समावेश यात होणार आहे का. त्याचप्रमाणे मोबाईल गाड्या असतात. टेम्पो यांतून जागोजागी भाजी विकायचा किंवा इतर व्यवसाय करतात. फुटपाथवरील गाड्या, भजी-वडापाव विक्री सेंटर यांच्यासाठी वेगळी नियमावली आहे का. यांचा सुद्धा समावेश करणार आहोत का याचा सुद्धा खुलासा व्हायला पाहिजे. प्रत्येकाचे वर्गीकरण कसे करणार. त्यांना कसा, काय चार्ज आकारणार आहोत याची सुद्धा माहिती मिळावी. धन्यवाद.

**मा.राजेंद्र जगताप**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, प्रत्येक वेळी प्रभागाच्या मिटींगमध्ये हा विषय असतोच. मा.खोसे साहेब ड प्रभागात सहा.आयुक्त म्हणून आहेत. हे फेरीवाले त्या परिसरातील नाहीत, बाहेरचे आहेत. ते दुकानदारासमोर त्यांची गाडी लावतात, टेम्पो लावतात, हातगाड्या लावतात. दुकानदार त्यांच्याकडून पैसे घेतात. म्हणून ते फेरीवाले त्या जागेवर आहेत. मी महापालिके फोन केला, त्यांना विचारले की, ते त्याठिकाणी महापालिकेचा राऊंड आला असल्याचे सांगतात. पण महापालिकेचा राऊंड येण्याआधीच हे फेरीवाले पळून जात असतात. याची माहिती कशी मिळते याच्यावर आपण लक्ष दिले पाहिजे.

कारण आमच्या प्रभागात जवळजवळ १० कि.मी.चे रस्ते आहेत. हे सगळे रस्ते पॅक असतात. पत्राशेड टाकून व्यवसाय करतात. त्यांना फेरीवाले म्हणता येणार नाही. यांना हॉकर झोन दिलेतरी ते तिथे थांबत नाहीत. यांना सवय लागली आहे. आणि आपलेच दुकानदारी व्यवसाय करणारे लोक त्यांच्याकडे पैसे मागतात व हातगाडी लावायला परमिशन देतात. फूटपाथ महापालिकेचा व पैसे घेणारं दुकानदार. आपण यावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. यावर आपण काहीच करत नाही. महापालिकेची गाडी आली की हे फेरीवाले गल्लीबोळापर्यंत पळून जातात. मा.आयुक्त साहेब, हा विषय तहकूब करावा. या विषयाचा पुन्हा सखोल अभ्यास करुन हा विषय चर्चेला आणावा. धन्यवाद.

**मा.राजेंद्र काटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, हा विषय तहकूब ठेवायला काही हरकत नाही. परंतू विषय तहकूब ठेवत असताना अष्टेकर साहेब किंवा संबंधित जे कोणी अधिकारी कारवाई करत असतील तर, त्यांनी जोपर्यंत हॉकर झोन होईल तेव्हा होईल. मी गेले दोन/तीन वर्षांपासून ऐकतोय की, सर्वे चालू आहे. परंतू त्या नावाखाली अनेक हॉकर्स वाढत चालले आहेत. त्याला नियंत्रित केले पाहिजे. याचे मला उत्तर पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे दापोडीसारख्या ठिकाणी फुगेवाडीच्या ब्रीजपाशी आपण ३० मी.चा रस्ता केला आहे. फक्त १० मी. रस्ताच शनिवारी व रविवारी वापरला जातो. तिथे अधिका-यांना सांगूनही ते काही करत नाहीत. आपण नक्की काय करतो ते कळत नाही. त्याठिकाणी एका चौकात ५० गाड्या उभ्या राहतात. आपले नक्की धोरण काय आहे. त्यांना या धोरणात बसवायचे आहे का ते मला काही कळत नाही. माझा स्पष्ट आरोप आहे की, यात कोणत्यातरी अधिका-याचे निश्चितच लागेबांधे आहेत. दापोडी मार्केट इथे रेलिंग लावून दिले. त्या रेलिंगच्या अलिकडे भाजीवाल्यांनी बसावे. अशी चांगली व्यवस्था देखील केली आहे. तुम्ही वन बाय वन मीटर म्हणताय पण तिथे एक दुकानदार दहा बाय दहा मीटरचा पसारा करुन बसला आहे. तिथे आपल्या अधिका-याचे किंवा महापालिकेचे कोणत्याही प्रकारे लक्ष नाही. मा.आयुक्त साहेब, संबंधित अधिका-यावर कारवाई का करत नाही. हॉकर झोन होतील तेव्हा होतील. त्यावर आत्ता नियंत्रण का ठेवले जात नाही, हा माझा महत्वाचा प्रश्न आहे. याचे मला उत्तर पाहिजे आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आत्ता अष्टीकर साहेबांनी सांगितले, प्रमाणपत्रे छापलेली आहेत. माझ्या घराशेजारी तुम्ही जर जागा आखून दिली आहे. ते तिथे व्यवसाय करायला आलेतर आम्ही काय करायचे. निश्चित प्रमाणपत्र देण्याअगोदर प्रत्येक व्यवसाय करणा-याची खात्री करुन मगच ते प्रमाणपत्र वाटले पाहिजेत. अन्यथा आमच्यावर अन्याय होईल. आम्हाला घर सोडून जावे लागेल. म्हणून पूर्ण माहिती न घेता कुठलीही प्रमाणपत्रे वाटू नका. नाहीतर काय होईल, माझे प्रमाणपत्र आहे असे सांगून दारावर

येतील, असे होऊ नये याची नोंद घ्यावी. अंतिम मान्यता दिल्याशिवाय कोणतेही प्रमाणपत्र वाटू नये. एवढेच मला सांगायचे आहे. धन्यवाद.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आम्ही गेले दोन टर्म ओरडतोय. हॉकर झोनचा, फेरीवाल्यांचा प्रश्न चर्चीला जातोय. पण त्यातून काही निष्पन्न होत नाही. त्याचबरोबर प्रशासन कोणत्याही प्रकारची कारवाई त्या फेरीवाल्यांवर करत नाही. आजपर्यंत पाहिले तर पॅरलल यंत्रणा जे कोणी सोकॉल्ड त्यांचे नेते आहेत किंवा काय ते तुम्हाला दोनशे रुपये सांगतात. त्यांच्याकडून दसपट पैसे गोळा करतात. त्या फेरीवाल्यांना तेच त्यांचे जन्मदाते वाटतात. किंवा त्यांचे पालनकर्ता वाटतात. महापालिकेला शून्य किंमत आहे. तुम्ही सांगा, प्रशस्तिपत्र किंवा ते प्रमाणपत्र वाटेपर्यंत एकाही नगरसेवकाला याची कल्पना नाही. तुम्ही सांगताय, प्रमाणपत्र तयार आहेत. वाटले नाहीत हे बरोबर आहे. पण ते वाटण्यासाठीच तयार आहेत. तुम्हाला कशाप्रकारे पात्र ठरवले ते आम्हाला माहित नाही. कोणाला अपात्र ठरवले ते आम्हाला माहित नाही. ज्यावेळी प्रत्येक नगरसेवक वॉर्डमध्ये काम करुन निवडून येतो. तेव्हा त्याला माहित असते कोण खरी गरजू आहेत, कोणाला या गोष्टीची गरज आहे. हे तो नगरसेवक बोलू शकतो किंवा त्याठिकाणी काम करणारे प्रशासनाचे अधिकारी बोलू शकतात. आज दूर्दैवाने त्यांचा फोटो त्या फेरीवाला संघटनेच्या गाडीवर लावलेला आहे. तेच त्यांचे पालनकर्ते आहेत. महापालिकेचा यात काही संबंध नाही. नगरसेवकांना ढूंकून विचारत नाहीत. म्हणजे महापालिकेच्या जीवावर यांनी पैसे कमवायचे. सर्वोच्च न्यायालय, आम्ही त्यांचा सन्मान करतो, पण त्यांच्या नावाखाली यांनी यांचे धंदे चालवायचे. आंधळं दळतयं, कुत्रं पीठ खातयं याप्रमाणे या फेरिवाला धोरणाचे झाले आहे. मा.महापौर साहेब, विषय तहकूब करुन आपण पळवाट काढू शकत नाही. यावर निर्णय झाला पाहिजे. महापालिकेने ठराव करुन शासनाकडे पाठवला पाहिजे. ज्या-ज्या प्रभागात, जी-जी जुनी लोकं आहेत, यांना डोमेसाईल सर्टिफिकेट कंपल्सरी करा. शाळेत ॲडमिशनसाठी जसे आपण सांगतो, तुम्ही किती वर्षे राहता. बापाचा दाखला आणा. आजोबांचा दाखला आणा. असे तुम्ही या टपरीधारकांना का करत नाही. परप्रांतिय लोंढे, बाहेरची लोकं, बाहेरची लोकं असे म्हणण्यापेक्षा हे लोक इथे येऊन पहिला धंदा करतात. आणि मग घर करतात. मग झोपडपट्टीत रहायला जातात. तिथून आपल्याकडे घराची मागणी करतात. आपले आधार कार्ड त्यांच्याकडे असते. आपले रेशनिंग कार्ड त्यांच्याकडे असते. तुमच्या बंगलेवाल्यांकडे चार-चार पिढ्या राहून जी कागदपत्रे नाहीत, ती त्यांच्याकडे ६ महिन्यांत येतात. तुम्हीच सांगा, आपण अशा लोकांसाठी काम करणार असू तर जो आपला प्रामाणिक मिळकत कर भरणारा नागरीक आहे, त्यांना आपण न्याय देऊ शकणार आहोत का. नाही. त्यामुळे प्रशासनाने लक्ष ठेवले पाहिजे. मा.आयुक्त साहेब, तुम्हाला माहित आहे की, मुंबईत गॅसट्रोची लागण झाली. कशामुळे रस्त्यावर विकणारे पाणीपुरीवाले, भेळवाले

यांच्यामुळे. यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे फुड लायसन नाही. तुम्ही बघताय का ते कुठून पाणी भरतात, कोणते पाणी भरतात, ते माहित नसते. लोकांचे आरोग्य नीट ठेवायची महापालिकेची जबाबदारी नाही का. या गोष्टीवर तुमचा कंट्रोलच नसलेतर हॉटेलमध्ये चाळीस रुपयाला जो वडापाव मिळतो, तो इथे चार रुपयाला मिळतो. लोकांना वाटते, पैसे कमी आहेत. लोक आरोग्य धोक्यात घालतात. मग या सगळ्या परिस्थितीची जबाबदारी कोण घेणार आहे. या परिस्थितीत पावसाळा जवळ आला आहे. सगळे साथीचे रोग इथे येणार आहेत. या परिस्थितीत फेरीवाल्यांकडून खाद्यपदार्थांचीच ५० टक्यांपेक्षा जास्त विक्री होते. मा.आयुक्त साहेब, तुम्हीच सांगा की, उद्या लोकांना काही रोगराई झालीतर कोण जबाबदारी घेणार आहे. माझ्यावतीने सभागृहाचा होकार असेलतर सभागृहाच्यावतीने मागणी असेल की, प्रत्येक नगरसेवकाला त्याच्या भागातून स्वतः ते फेरीवाले ठरवायला तुम्ही संमती दिली पाहिजे. त्यासाठी कागदपत्रे कठोर करा. त्यांना २० वर्षे / २५ वर्षे असा स्वतःचा रहिवास दाखला दाखवून द्यात. अशांनाच द्या. तुम्ही कोणत्याही प्रकारचा व्यवसाय देऊ शकत नाही. तुम्ही कोणत्याही प्रकारचा धंदा देऊ शकत नाही. एखादा माणूस व्यवसाय करायचा म्हणत असेलतर तुम्ही त्याला परवाना मागता, शॉप ॲक्ट मागता, फूड लायसन मागता. जागा आहे का ते मागता. म्हणजे तुमच्याकडे नियमाने येणा-याची तुम्ही तर वाटच लावता. आणि अशाप्रकारे अनधिकृतपणे जे लोक घुसतात, त्यांच्यासाठी काय-काय केले जाते. मग आम्ही इथे कशासाठी निवडून आलो आहोत. आम्ही कुणासाठी काम करतोय. अधिकारी बाहेरून आलेले असतात. ते येतात, काम करतात, निघून जातात. काळ्याची पांढरी करतात. पांढ-याची काळी करतात. लाल करतात. त्यांना या शहराचे काही देणेघणे नाही. मा.महापौर साहेब, अधिकारी ज्या खुर्चीवर बसतात त्या अधिका-यांची ही जबाबदारी असते. लोकप्रतिनिधी म्हणून आमच्यावर ही जबाबदारी येते. कार्यकर्ते आम्हाला सांगतात, आम्ही इतकी वर्षे काम करतोय. अधिकृत टपरी सुद्धा टाकू शकलो नाही. अनधिकृत काम करा असे मी बोलणार नाही. परंतू तुम्हीच सांगा, किती वर्षे लायसन द्यायचे बंद केले आहे. अपंगांना पण लायसन देत नाही. आज दूध, फळ-भाजी विक्रेते असतील, चर्मकार असतील या प्रत्येक गोष्टीची वॉर्डात आवश्यकता आहे. यांच्यासाठी तरी तुम्ही वॉर्डात लायसन ठेवा. या गोष्टीची प्रत्येकाला गरज आहे. सत्तारुढ पक्षनेत्या सुद्धा किती वेळा म्हणाल्या आहेत की, फिरणा-या गाड्या घाण करतात. कोण ऐकतोय. आम्ही या गोष्टीवर सभा तहकूब करायची काय. कुणाला गांभिर्य नाही. पण जबाबदारी मात्र प्रत्येकाची आहे. शेवटच्या माणसापर्यंत ही जबाबदारी येऊन पोहोचते. निदान खाण्यापिण्याच्या गाड्यांच्या बाबतीत तरी या इन्स्ट्रक्शन्स पाळा. त्या डिश ते नीट धूत नाहीत. नुसतेच बादलीत बुचकळतात. तिकडचेच घाण पाणी वापरतात. या सगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे यांच्यावर कडक कारवाई व्हावी. हा विषय अशाप्रकारे करायचा नसेलतर दुसरा

विषय करुन स्थानिक जे लोक आहेत त्यांच्याकडून कागदपत्रांची अट सक्त करुन, त्यांना या धोरणात समाविष्ट करुन घ्यावे. धन्यवाद.

**मा.उल्हास शेट्टी**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,ब-याचशा नगरसेवकांनी याठिकाणी आपले मत मांडले आहे. काही जास्त, पूर्ण क्लिअर करु शकत नसलोतरी शहरातील चौक तरी क्लिअर केले पाहिजे. कारण मेन चौकातच खरा प्रॉब्लेम निर्माण होतो. आज भक्ती-शक्तीपासून दापोडी, सांगवी एरियात गेलात तर चौकातच लोकांचा व्यवसाय जास्त असल्यामुळे प्रत्येकाला वाटते की इथेच बसावे. भेळ चौक, टिळक चौक, चिंचवड स्टेशन इथे लोकांची घरे पाडून ६१ मी.चा रस्ता केलात. पण तिथे चायनिजच्या गाड्या, भेळपुरीच्या वडापावच्या गाड्या. चौक असून देखील चौकातून गाड्या जाऊ येऊ शकत नाहीत. तिथे कमर्शियल एरिया असल्यामुळे समोर बिल्डींग आहे. शेजारी अस्तित्व मॉल आहे. रस्ता इतका अरुंद झाला आहे. महापालिका सभेत हा प्रश्न फिरुन फिरुन येणार आहे. भक्ती शक्ती इथे तुम्ही लाखो कोटी रुपये खर्च करताय. ब्रीज करताय. मुकाई चौकात जा काय परिस्थिती आहे. मा.आयुक्त साहेब तुम्ही बिग इंडियाच्या ऑफीसपासून भक्ती-शक्तीचा चौक क्रॉस करुन दाखवलात तर तुम्हाला पाहिजे ते बक्षिस देऊ. तुम्ही फक्त टू व्हिलरवरुन भक्ती-शक्ती चौक क्रॉस करुन दाखवा. फोर व्हिलरतर लांबची गोष्ट आहे. त्याठिकाणी आता दहा दहा बारा बारा डब्यांच्या ट्रेन रोडला फिरायला लागल्या आहेत. तिथे लहान मुलांना किंवा कुणाला अपघात झाल्यावर मग आपण आरडाओरडा करतो. आपण खबरदारी का घेत नाही. करदात्यांचा काही अधिकार आहे का नाही. काही मुठभर लोकांसाठी आख्या शहराला, गोरगरीबांना वेठीस धरायचे का. मला आठवतेय, मागील वेळी मी आकुर्डी-दत्तवाडीचा नगरसेवक होतो. मा.आशिष शर्मा आयुक्त होते. फूटपाथ ग्राऊंड लेव्हलला करण्यासाठी त्यांना विनंती केली होती. त्यावेळी टिळक चौकापासून भेळ चौकापर्यंत फूटपाथ करण्यात आला. पण आज परिस्थिती काय आहे. फूटपाथवर चालायला जागा नाही. फूटपाथवर चायनीजच्या, खाद्यपदार्थांच्या गाड्या आहेत. मग ज्येष्ठ नागरीकांनी कसे चालायचे. यांच्यासाठी फूटपाथ करायचा का. यासाठी लाखो, करोडो रुपये खर्च करायचे का. ते बंगल्यावाल्यांना पाच/दहा हजार भाडे देतात. त्यांचा व्यवसाय होतो. मागील मिटींगमध्ये चर्चा करत असताना मी म्हणालो होतो. आम्ही गेलो की, आमच्याकडे लोक संशयाने बघतात. आम्ही पैसे देतोय का नाही असे म्हणतात. गवगवा होतो. आपला आरोग्यचा, अतिक्रमण विभागाचा कर्मचारी वर्ग आहे त्यांचे यांच्याशी साटेलोटे आहे महापालिका सभेमध्ये यावर इतका विचार करत असताना एवढा विषय निघाला आहे. प्रत्येक ठिकाणी हाच प्रॉब्लेम आहे. मला माहित आहे, या गोष्टी एका दिवसांत होणार नाहीत. मा.महापौर साहेब, तुम्ही तर परदेशात जाऊन आलात. तीन तीन व्हिजिट केल्या आहेत. तिथे कुठे टप-या आहेत का, फ्लेक्स आहेत का. तुम्ही एवढा अभ्यास करुन आला आहात तर चौक तरी क्लिअर करा. बघा

तुम्हाला शाबासकी मिळेल. कोणी चौकात जाऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. त्यांनी पण ऍटलिस्ट विचार करायला पाहिजे. हा सिरिअस मॅटर आहे. आता फ्लेक्सबाबतीत बोलतोय. रोडमध्ये काही मांडववाल्या लोकांनी मोठमोठे ४० बाय ४० चे सांगाडे प्रायव्हेटली उभे केले आहेत. तिथे फ्लेक्स काढायचा, योगेशभाईंचा लावायचा. योगेशभाईंचा काढायचा आणि प्रशांत शितोळेंचा लावायचा. अशा पद्धतीने त्याठिकाणी त्या मांडववाल्याने धंदा सुरु केला आहे. एकच सांगाडा लावला आहे. त्यावर फक्त पोस्टर चिकटवतो. मी मागच्या वेळी भूमि आणि जिंदगीच्या विषयावर बोललो होतो. मी प्रभागातील मिटींगमध्ये अनेक वेळा बोललो आहे. शून्य रिझल्ट आहे. कोणालाही शहराशी काही देणेघेणे नाही. या शहराचे काही होणार नाही. तुम्ही अभ्यास करा, फॉरेनला जा, शिकून या, काहीही करा. जोपर्यंत माणसाची मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत या गोष्टी होऊ शकत नाहीत. काय परिस्थिती आहे. पण मला तरी वाईट वाटते. मी बघतो. मी फॉरेन टूरला जातो. काही तरी केले पाहिजे असे वाटते. आज संधी आहे, योगायोगाने मी पालिकेत आहे. पण मी बोलणे गरजेचे आहे. पालखी आली तुम्ही फ्लेक्स लावा हरकत नाही. पण तुम्ही आख्खा सांगाडा कसा काय करु शकताय. नगरसेवकांचा वॉटस्  अप ग्रुप तयार करा. फोटोंची लाईन लागेल. फोटो काढले की फोटो पाठवतील म्हणून कोणताही अधिकारी व्हॉटस्  अप ग्रुपवर नाही जसे राजकीय लोक मिडीयाचा उपयोग करत आहेत. काय काय परिस्थिती आहे चायनीजच्या गाड्या, दारुची विक्री. तुम्ही ज्या खुर्चीवर आहात त्या खुर्चीला न्याय द्या. कमीत कमी चौक तरी क्लिअर करा. काही ठराविक बोटावर मोजण्याइतके लोक नावं ठेवतील. पण टॅक्सपेअर, ज्येष्ठ नागरीक या गोष्टीवर तुम्हाला शाबासकी देणार आहेत. आम्ही दोन महिन्यांत बघू. टिळक चौक, भक्ती-शक्ती चौक क्लिअर होतील. इथे निस्वार्थीपणे काम करा. काही ठिकाणी आयुक्तांची कुठे बदली झालीतरी लोक रस्त्यावर येतात. असे तुमच्याबाबतीत होईल, अशी आम्ही आशा बाळगतो.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मी गेले १५ वर्षे या सभागृहामध्ये आहे. माझ्या अगोदरचे सिनिअर सदस्य सुद्धा इथे आहेत. या धोरणाबाबतीत या सभागृहाने अनेक वेळा चर्चा ऐकली आहे. मी ज्यावेळी स्थायी समितीचा अध्यक्ष होतो, त्यावेळी हा विषय अंतिम स्वरुपाला आला होता. त्यावेळी या लोकांची संख्या जवळपास ५,००० हातगाड्या होती. पाच हजार लोकांसाठी लायसन्स म्हणजे आम्ही जेव्हा ग्रुप बघायला गेलो होतो. त्यावेळी मा.योगेश बहल होते, मी होतो, त्यावेळी पक्षनेते मा.जगदीश शेट्टी होते. मा.आयुक्त साहेब, मी तुम्हाला मुद्दाम सांगतो, त्यावेळी या लोकांना ओळखपत्र देताना ते कसे असावे, काय काय उल्लेख असावा. त्याचा बेस कसा असावा. अगदी फायनल पर्यंत गेलो होतो. आजरोजी या शहराचा बकालपणा या लोकांमुळेच वाढला आहे. त्याचवेळी या लोकांना मर्यादीत वेळेत सगळ्या गोष्टी कायद्यात करुन दिल्या असत्या तर हे धोरण कन्फर्म व्हायला वेळ लागला

नसता. दरवेळी रिव्हिजन होते, केंद्र शासन आपल्याला गाईडलाईन देते. कोणीतरी कोर्टात जाते. राज्य शासन काहीतरी गाईडलाईन देते. त्याप्रमाणे आपल्याला सुधारणा करावी लागते. आज मा.महापौर साहेब, मी तुम्हाला मुद्दाम आठवण करुन देतो. प्रत्येकाने त्याच्या-त्याच्या भागातले सांगितले. हे लोकं शहरात जिथे जिथे थांबतात. त्याच्या मागच्या दुकानदाराला दोन हजार रुपये भाडे चालू असते. खरेतर हे भाडे महापालिकेला मिळायला पाहीजे. तो कोणाला देतो, मागच्या दुकानदाराला. तो फक्त सांगतो, माझा आतमध्ये यायचा रस्ता आडवायचा नाही. त्याला फुकट भाडे मिळते. आम्हाला हातगाडी लावायला हरकत काय. आज यांच्यामुळे शहर एकिकडे मर्यादीत राहिले असते तर जी सुविधा पाहिजे मग ती भाजीपाल्याच्या स्वरुपात म्हणा किंवा मग ती अत्यावश्यक सेवा असलीतरी ती लोकांना तशी मिळाली असती. त्यांचा रोजीरोटीचा प्रश्न भागला असता. त्यांच्या पोटावर अन्याय व्हावा अशी नियमावली नक्की नसावी. परंतू त्यांच्यामुळे शहरात बकालपणा नसावा इतके भान नक्की असावे. सर्वांच्या सहकार्याने आज शहरात त्यांना वावरायला मिळते आहे. तुम्हाला आठवत असेल, मुंबईत जे फेरीवाले आहेत, त्यांच्यात सगळ्यात जास्त फेरीवाले हे युपी, बिहीरी आहेत. आज त्या परिसरात इतके फेरीवाले आहेत, इतकी जास्त संख्या झाली आहे की पिंपरी चिंचवडमध्ये सुद्धा इतके फेरीवाले आहेत. आज ते शेंगदाणा-फुटाण्यावरच राहीलेले नाहीत. आज ते वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ विकतात. फेरीवाल्यांची एक नियमावली नाही. आज ते गोरगरीब नाहीत. आमच्या परिसरात एका फेरीवाल्याच्या पाचशे गाड्या आहेत. रिक्शावाल्यांच्या शिफ्ट असतात, तशा शिफ्ट या गाडीवाल्यांना तीनशे रुपये, चारशे रुपये अशा द्याव्या लागतात. समजा एखाद्याच्या शंभर गाड्या असतील तर त्याचे रोजचे उत्पन्न झाले पाच हजार रुपये. म्हणजे त्याचे महिन्याचे उत्पन्न दीड लाख. त्याचे एक आयकार्ड असते. त्याच्या दहा कॉपीज् करुन तो वाटत असतो. ज्याठिकाणी रोजगार पाहीजे, रोजीरोटी पाहीजे. या शहरात सगळ्यांनाच मुबलक प्रमाणात अन्न मिळाले पाहिजे अशा प्रकारची रोजगार व्यवस्था असावी या भूमिकेबद्दल कुणाचे दुमत असायचे काही कारण नाही. पण ते या शहरात येऊन अशाप्रकारचे धंदे करतात. त्यांचा आपल्या शहरावर अन्याय होतो हे देखील कुठेतरी विसरता कामा नये. यासाठी महापालिका त्यांना सुविधा देणार असेलतर त्या सुविधा जेवढ्या चांगल्या पाहिजेत, तेवढ्या कडक सुद्धा राहिल्या पाहिजेत. आज काय होते आहे, अशाप्रकारे महापालिकेने चांगल्या सुखसुविधा केल्या. चांगले, मोठे रस्ते केले म्हणून ते रस्ते आपलेच आहेत, घरचे रस्ते आहेत, ते आपल्याच करातून झाले आहेत. म्हणून हातगाडी लावून बेकायदेशीर व्यवसाय करायचा अशी त्यांची मानसिकता असेलतर ती बदलायचे काम सुद्धा आपलेच आहे. या फेरीवाल्यांवर कारवाई करा असे म्हटलेतर आपले अतिक्रमण पथक जाम ऍक्टीव्ह आहे. आमच्या परिसरात मागील आठवड्यात कारवाई झाली. सारख्या चुकीच्या येतात. चुकीच्या बातम्या येत नाहीत. केवळ कारवाईचा फार्स करतात. दुस-या दिवशी जायचे. तो फेरीवाला असेलतर त्याचा

वजनकाटा उचलून आण. त्याची भाजीच पळवून ने. ही सगळी चिंधीगिरी झाली. कर्मचा-यांना सुद्धा कुठेतरी धाक असला पाहिजे. त्याच्याकडून हप्ता वसूल कर, त्याची भाजी घेऊन जा, त्याच्याकडून वजन काटाच घेऊन जा. ही कुठली फेरीवाल्याला दंड करायची पद्धत. एसआय यांना अधिकार आहेत. एसआयकडून रोज त्यांच्याकडून शंभर रुपये, पाचशे रुपये दंड वसूल करा. आपोआप संख्या कमी होईल. याचा अर्थ त्यांना दंड करा असे आम्ही सांगत नाही. त्यांनी त्यांची वसूली शंभर टक्के केली पाहिजे पण काहीतरी नियमावली पाळा. आम्ही जर तुम्हाला हॉकर झोन करुन देत असू. प्रत्येक वॉर्डमध्ये हॉकर झोन असतील तर तिथे त्या फेरीवाल्यांनी बसले पाहिजे. मी आज तुम्हाला खात्रीने सांगतो की, शहरात किमान ५०,००० गाड्या आहेत. तुमच्याकडे दहा ते पंधरा हजार गाड्यांची नोंद होईल. पण परिसरात ५०,००० हातगाड्या फिरतात. आत्ता योगेश भाईंनी सांगितले की, भाजीवाले गेले की त्यांची जागा चायनीजवाल्यांनी घेतली आहे. चायनीजवाले तर किती घाण करतात ते विचारायचेच नाही. आपण एकिकडे स्वच्छ भारत अभियान राबवतोय. स्वच्छता ठेवायचे काम या चायनीज गाड्यांचे नाही का. त्यांनी रात्री उशीर झाला की सगळा कचरा बॅगेत, पोत्यात भरायचा. सायकलवरून सांडवत सांडवत रस्त्यावर आणायाचा व त्या कचराकुंडीत आणून टाकायचा. कचरा रस्त्यावर सांडतो. मग त्याच्या मागे कुत्री आहेतच. मग तुमचा ऍनिमल ऍक्ट मागे आहेच. स्वच्छ भारतसाठी दोन वर्षे प्रयत्न करतोय. पंतप्रधानांचे स्वप्न आहे, संपूर्ण भारत स्वच्छ झाला पाहिजे. आपण पाळतोय. प्रशासन सुद्धा पाळतेय. हे खरे होते आहे का. ही केवळ महापालिकेची जबाबदारी नाही. प्रत्येकाची नागरीक म्हणून माझी सुद्धा जबाबदारी आहे. ही जबाबदारी मला कळत नसेलतर कुठेतरी प्रबोधन करा. मला जाणीव होईल की, कुठपर्यंत तुमची यंत्रणा आली पाहिजे. आज फेरीवाल्यांचा विषय दोन दोन तास चर्चेचा असलाच नाही पाहिजे. महाराष्ट्र शासनाच्या कृषि पणन विभागाकडून आज शहरात अनेक ठिकाणी आठवडे बाजार चालू आहे. गेले ३/४ वर्षे शहरात वेगवेगळ्या ठिकाणी चालू आहे. ते बिचारे शेतकरी येतात. त्यांचा टेम्पो आणतात. त्यांची ताजी भाजी आणतात. वेगवेगळ्या ठिकाणी रोज ४/५ तास दुपारी ३.०० ते संध्या. ८.०० वा. पर्यंत धंदा करतात. त्यांचा जो काही कचरा आहे तो उचलून टेम्पोत घालून परत घेऊन जातात. जो मूळ उत्पादक आहे तो तिथे चांगल्या पद्धतीने व्यापार करायचा प्रयत्न करतो. आपण मात्र या फेरीवाल्यांना जास्त सवलती दिलेल्या आहेत. आपल्याकडे असे किती फेरिवाले असतील जे त्यांच्या जागेवरचा कचरा ते स्वतः साफ करतात. कोणच नाही. मासेवाले हातगाडीवर बसतात. त्यांचा रस्ता कुठे असतो. खाली रस्त्यावर. आपल्या शहराला बेस्ट सिटी, क्लिन सिटी अवॉर्ड मिळत असेल. आपल्याला काही दिवसांपूर्वी स्वच्छतेसाठी पुरस्कार मिळाला आहे. पण या अस्वच्छतेमध्ये ज्यांच्यामुळे भर टाकली जाते, त्या प्रत्येक व्यक्तीवर ही कारवाई झाली पाहिजे. कारवाई करणे हा यामागील हेतू नाही. परंतू त्यांचे प्रबोधन होऊन शहरातील प्रत्येकाला ही जाणीव व्हावी, आपले शहर

स्वच्छ असले पाहिजे. त्या घाणीला मी जबाबदार नको व्हायला असे प्रत्येकाला जेव्हा वाटेल त्यावेळी हे शहर स्वच्छ होईल. या फेरीवाला धोरणात कुणालाही हाडहुड करुन त्यांना हद्दबाहेर करा, त्यांच्यावर अन्याय करा असे अजिबात नाही. पण आपल्याला त्यांच्याकडून योग्य व्यवसाय अपेक्षित असेलतर त्यांना नक्की राज्य शासन व केंद्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली कुठेतरी नियमावली चांगली असली पाहिजे. त्याची अंमलबजावणी आपल्याकडे व्यवस्थित झाली पाहिजे एवढेच माझ्यासारख्याला वाटते. फेरीवाल्यांना सुद्धा समाधान वाटेल. इतपत चांगल्या पद्धतीची कारवाई आपल्याला प्रशासनाकडून अपेक्षित आहे. या निमित्ताने प्रशासनाने ती करावी एवढीच या निमित्ताने विनंती करतो व थांबतो. धन्यवाद.

**मा.आर.एस.कुमार**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,शितोळे साहेबांनी सांगितले, ते गेले १५ वर्षांपासून ऐकत आहेत. पण मी गेले ३० वर्षांपासून हॉकर झोनबद्दल ऐकतोय. दरवर्षी मा.महापालिका सभेत आणि प्रभाग समितीत देखील यावर चर्चा होते. हॉकरझोनबद्दल कुठेही काहीही धोरण नाही. कुठल्याही वॉर्डात झाले आहे असे वाटत नाही. फक्त चर्चा, चर्चा, चर्चा. प्रशासन यात इंटरेस्ट का घेत नाही. हॉकर झोन का करत नाही ते समजत नाही. कदाचित यात काही मिळत नाही म्हणून काही करत नसतील. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना फूटपाथवर हॉकर्स असतात. त्यांच्याकडे येणारा कस्टमर फूटपाथच्या समोर गाड्या लावतो. नंतर डिव्हायडरमधून ट्रॅफिक कसे जाणार. पॉवर्टी ऍलिव्हिएशन कमिटी म्हणून सेंट्रल गव्हर्नमेंटची एक कमिटी आहे. त्या कमिटीने कायदा केला आहे. त्यात स्पष्ट लिहिले आहे. हॉकर्समुळे ट्रॅफिकला अडथळा असेलतर त्याचे झोन करा. त्यात शिफ्ट करा. नाही म्हटले तरी एक लाख लोकसंख्या या फेरीवाल्यांवर अवलंबून आहे. फार मोठी संख्या आहे. यांना रोजीरोटी मिळाली पाहिजे. यांना शिफ्ट करा. हॉकर झोन करा. का करत नाहीत ते मला समजत नाही. भक्ती-शक्ती चौक कधी बघितलाय का. पूर्ण रस्त्यावर हॉकर्स थांबलेले असतात. शंभर लोक रस्त्यावर असतात. त्यांनी दुकान मांडलेले आहे. तिथे छोटीशी ट्रेन चालू आहे. मोठी-मोठी खेळणी आहेत. ट्रॅफीकला जायला रस्ताच नाही. मी प्रशासनाला अनेक वेळा सांगितले. ते काढा. मोकळे करा. लक्षच देत नाहीत. वर्षात कधीतरी कारवाई करतात. लक्षच देत नाहीत. मी अनेक वेळा सांगितले, चर्चा झालीतरी अजूनही फ्लेक्स काढत नाहीत. प्रत्येक चौकात फ्लेक्स लावले आहेत. त्यांच्यावर कारवाई का करत नाही. सेपरेट झोन द्या. टिळक चौकात एवढाच रस्ता आहे. तिथेच सर्वप्रकारच्या हातगाड्या उभ्या असतात. ट्रक किंवा बस तिथून जाऊ शकत नाहीत. एकतर कारवाई कधीतरी करतात. नियमितपणे कारवाई करत नाही. यात हप्ता चालू आहे का अशी शंका येते. भक्ती-शक्ती इथे हप्ते चालू आहेत. कोण घेतो, काय घेतो माहित नाही. पण हप्ते चालू आहेत. शितोळे साहेबांनी सांगितले, मीही सांगतो, पंचवीस/पन्नास गाड्यांचा एक मालक आहे. तो गाड्या भाड्याने देतो. तिनशे रुपये भाडे देऊन तो हातगाडीचा वापर करतो.

तो पैसा मालकाला देतो. मला खात्री आहे. तुम्ही लवकर करणार नाही. मी गेले ३० वर्षांपासून हेच ऐकत आलोय. ही माझी सहावी टर्म आहे. याचे वाईट वाटतेय. आपण गरीबांसाठी काहीतरी केले पाहिजे. गरीबांचा कोण विचार करणार. ३०/३० वर्षे झालीतरी कोणी लोकांची काळजी घेत नाही याचे वाईट वाटतेय. मा.महापौर साहेब, हॉकर झोन करायला पाहिजे असा तुम्ही प्रशासनाला आदेश द्या.

**मा.मोहिनी लांडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी बरेच वर्षांपासून गेले १५/१६ वर्षांपासून हॉकर झोनच्या विषयाबाबतीत ऐकतेय. हाच विषय सारखा चालला आहे. हॉकर झोन होणार नाही हे मला देखील माहिती आहे. इतके फेरिवाले आहेत त्यांना प्रत्येकाला देऊ शकत नाही. सर्वांचा विकास करु शकत नाही. भोसरी परिसर सर्वांना माहित आहे. तिथे मंगल कार्यालये जास्त आहेत. हातगाड्यांमुळे ट्रॅफिक जाम होते. चायनीजच्या हातगाड्या उभ्या असतात. आज उड्डाण पुलाखाली पाहिलेतर तिथे आंब्याच्या गाड्या इतक्या लागलेल्या आहेत. प्रभागात किती वेळा सांगितले आहे की, कारवाई करा. पण कोणी कारवाई करत नाहीत. सकाळी येतात, पाहतात, आहे तसेच चालू असते. मा.दुरगुडे मॅडम तिथे प्रभाग अधिकारी होत्या. त्यांनी स्वतःची बदली करुन घेतली की, मला नको ते अतिक्रमण. आम्ही गेलो की तिथे आम्हाला कोणी जुमानत नाही. हा काय म्हणेल, तो काय म्हणेल याचे त्यांच्यावर प्रेशर असते. म्हणून त्यांनी तिथून त्यांची बदली करुन घेतली. हा प्रकार किती दिवस चालणार आहे. आम्ही किती वेळा सांगितले की, तिथे कारवाई करा. या टप-या उचला. फेरीवाले म्हणजे नक्की काय ते आम्हाला कळाले नाही. मला याचा खुलासा करुन पाहिजे आहे. मंगल कार्यालयांच्या बाजूला दुकाने आहेत. स्थिर फेरीवाले असे आज इथे अष्टेकर साहेब म्हणाले. पण स्थिर फेरीवाले म्हणजे नक्की काय प्रकार आहे ते कळालेले नाही. फूटपाथ फक्त चालण्यासाठी ठेवलेला असतो. पण फूटपाथवर दुकानदारांचा माल असतो. मग त्या चालणा-यांनी नक्की कुठून चालायचे हे सुद्धा कळत नाही. त्यामुळे तो परिसर अतिशय बकाल झाला आहे. नाट्यगृहाच्या परिसरात रिक्शा स्टँड आहे. तिथेच मच्छिवाले बसलेले असतात. मग लोकांनी नक्की कुठून कसे चालायचे हा प्रश्न लोकांना भेडसावतो आहे. आज आपण बरेच ठिकाणी पाहतो की, संपूर्ण पिंपरी चिंचवड परिसर बकाल झाला आहे. आपण स्वच्छता अभियान करतोय. आपल्याला बेस्ट सिटी अवॉर्ड मिळाला आहे. पण त्याचा काही उपयोग नाही. आपल्याला बेस्ट सिटी पुरस्कार कशामुळे मिळाला ते कळत नाही. कारवाई ही केलीच होती. अतिक्रमण विभागाकडून या फेरीवाल्यांवर कारवाई केलीतर नक्की फायदा होईल. पण आपण चार दिवस कारवाई करतो, चार दिवस करत नाही. त्यामुळे पुन्हा आहे तीच परिस्थिती असते. संध्याकाळी ५ नंतर या गाड्या फिरवाव्यात, असे मी बरेच वेळा सांगितले आहे. दुपारी ४ नंतर गाड्या फिरवा. अधिका-यांनी जागरूक राहून व सर्व नगरसेवकांना विचारात घेऊन

केले पाहिजे. तुम्ही जे पत्रक काढले आहे, त्याची आम्हाला नीट माहिती नाही. पत्रक कधी काढले, कसे काढले, आम्हाला काहीच माहिती नाही. अधिकारी नगरसेवकांना भेटत नाहीत. आपण त्यांना चार-चार वेळा फोन केले की, ते म्हणतात आज कारवाई झाली, आता नंतर लगेच होणार नाही. आपण जास्तीत जास्त अधिका-यांना दम देऊन सांगा की, लवकरात लवकर ही कारवाई झाली पाहिजे. दररोज गाड्या फिरल्या पाहिजेत म्हणजे त्याचा नक्कीच फायदा होईल.

**मा.झामाबाई बारणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,हा विषय बरेच वेळा गाजलेला आहे. आणि आजची ही चर्चा खूप वेळ चालली आहे. अतिक्रमण आणि ज्या परिसरात, ज्या-ज्या भागात चौक आहे, हातगाडीवाले असतील, पथारीवाले असतील, व्यवसाय करणारे असतील, तिथे गेलात तर अशी काय परिस्थिती असते. आज तुम्ही डांगे चौकात जा. रविवारी तर तिथे पायी चालायला सुद्धा जागा नसते. त्या भागातून, त्या चौकातून पुढे निघून जायला जागाच नसते. एवढी परिस्थिती वाईट असते. पायी चालणारे तसेच, टू व्हिलरवाले तसेच, हातगाडीवाले तसेच, व्यवसाय करणारे तसेच. चालायला एवढी सुद्धा जागा नसते. अशा पद्धतीने परिसरात चारही बाजूंचे रस्ते जाम झालेले असतात. हातगाडीवाले असतात, व्यवसाय करणारे असतात. सूया,मणी,बिब्बे विकणा-या त्या बायका तिथेच बसलेल्या असतात. ते व्यवसाय करणारे बसलेले असतात तिथूनच पायी चालणा-यांना जावे लागते, अशी परिस्थिती डांगे चौकात आहे. हिंजवडीकडे जाणा-या रस्त्याला हिच परिस्थिती आहे. ताथवडे कडून येताना शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर मासे विकणारे बसलेले असतात. ते माशांची घाण, पाणी रस्त्यावरच टाकतात. त्यामुळे चालताना खूप वास येतो. त्या भागात अनेक व्यवसाय करणारे आहेत. परंतू व्यवसाय करत असताना त्यांनी त्यांच्या परिस्थितीनुसार केला पाहिजे. त्यांच्या सुद्धा पोटापाण्याचा विषय आहे. रस्त्यात जे गर्दी करतात, त्यांनी त्यांच्या पद्धतीने व्यवसाय केला पाहिजे. अतिक्रमणवाले तिथे जात असतील असे मला वाटत नाही. मा.आयुक्त साहेब, त्या रस्त्याने अनेक नगरसेवक, महापौर मॅडम तुम्ही सुद्धा गेला आहात. परंतू रविवारचा दिवस म्हटले की डांगे चौकात नको वाटते. एवढी बिकट परिस्थिती असते. त्यांनी त्यांचा व्यवसाय करावा. परंतू जागा सोडून. मी मागील वेळी सुद्धा म्हटले होते की, डांगे चौकात पाठीमागील बाजूला मोकळे मैदान/जागा आहे. डेअरी फार्मच्या त्या कोप-यात मोकळी जागा उपलब्ध आहे. तुम्ही रितसर परवानगी घेऊन या व्यवसाय करणा-यांसाठी जागा उपलब्ध करुन द्यावी. किंवा महापालिकेच्या अतिक्रमणवाल्यांनी तशी कारवाई करावी. पण ते एखादे दिवशी कारवाई करतात. मग या लोकांनी पळापळी करायची. संध्याकाळी १० वाजेपर्यंत त्यांचा व्यवसाय चालू असतो. रात्री १० नंतर गेलो किंवा सकाळी पाहिलेतर सगळा कचराच कचरा असतो. आत्ता मा.प्रशांत शितोळे यांनी सांगितल्याप्रमाणे तसे ते सगळा कचरा पोत्यात भरून न घेता तसाच

उघड्यावर टाकून निघून जातात. मासेवाले बसतात, तिथे तर अत्यंत दुर्गंधी पसरलेली असते. त्याठिकाणी हॉकर झोनसाठी जिथे जागा उपलब्ध असेल तिथे असा व्यवसाय करणा-यांना जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे. आत्ता ब-याच जणांनी सांगितले, दुकानांसमोर हातगाडीवाले गाडी लावतात व व्यवसाय करतात. दुकानदार त्यांच्याकडून हप्ता घेतात. डांगे चौक असेल. १६ नंबर असेल, रोड महापालिकेचा, जागा महापालिकेची. पण व्यवसाय करणारे हे लोक असतात. हा प्रकार कुठेतरी थांबला पाहिजे. हॉकर झोनसाठी प्रत्येक प्रभागात असेल त्या त्या ठिकाणी जागा उपलब्ध करुन द्यावी, एवढीच विनंती करतो. त्या लोकांना व्यवसायासाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन द्यावी. डांगे चौकासारख्या रस्त्यांबद्दल अतिक्रमणवाल्यांनी लक्ष द्यावे असे याठिकाणी सांगू इच्छिते.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मा.अष्टेकर साहेब व मा.आयुक्त साहेबांनी फेरीवाल्यांच्या नोंदणीचे दर एक हजार रुपयांवरुन दोनशे रुपये करण्याचा विषय आहे. परंतू सगळ्या लोकांच्या चर्चेतून काय आले आहे. तिथे जाऊन दोन हजार रुपये सुद्धा घेतात. काय चालते, कसे चालते हे याचे स्पष्टीकरण सगळ्यांनी केले आहे. कागदावर दाखवायला हे चित्र आहे की, दोनशे रुपये इतके कमी करणे. हे फक्त दाखवण्यासाठी आहे. कारण सगळे सभागृह खोटे बोलतेय का. तसेही सांगा. म्हणजे याचाच अर्थ तुम्ही जे जे काही केले आहे. तुमचे किती लोकं. तुम्ही सांगितलेय, ८८९० लोकं. नगरसेवकांना फक्त त्यांच्या वॉर्डातली यादी द्या की, त्यांच्या वॉर्डात असे किती लोक आहेत. तुम्ही कुठले स्थिर दिले, कुठले फिरते दिले, हॉकर झोनसाठी कुठल्या टप-या तुम्ही धरल्या आहेत. जिथे नव्हत्या त्या सुद्धा टप-या तुम्ही हॉकर झोनसाठी धरल्या आहेत. हॉकर झोनसाठी तयारी केली त्या टप-या जुन्या झाल्या. त्यांना दिल्या नसताना ती लोकं तिथे घुसली, तिथे राहत आहेत, तिथे बिझनेस करत आहेत. याचे तुम्ही काय करणार. त्या-त्या वॉर्डातल्या त्या-त्या नगरसेवकांना पहिल्यांदा माहिती द्या की, खरोखरच हा माणूस इथला आहे का. तिथे गरजेचे आहे का. ज्या नगरसेवकांना असे वाटत असेल की खरेच हा गरीब माणूस आहे. आणि आपल्या नागरीकांसाठी हे वॉर्डात पाहिजे परंतू ही हातगाडी नको आहे. तर त्याला दुकान देतील. कोणत्या वॉर्डात नको आहे. म्हणजे बघा, काही वॉर्डात २५ वर्षांच्या टप-या नगरसेवकाने काढल्या आहेत. आणि आपले अधिकारी, अतिक्रमण विभागाचे लोक. तुम्ही मला सांगा, नगरसेवक किती पूरा पडेल. इथलं काढलं की दुस-या ठिकाणी नेऊन ठेवतात. काही विभाग, काही वॉर्ड असे करा, ज्या नगरसेवकांना त्यांच्या वॉर्डमध्ये टपरी नको आहे, फिरती गाडी नको आहे. यातले बरेचसे नगरसेवक असे आहेत. मुद्दा आता याच्यावर थांबलेला नाही. तुम्ही मला सांगा, प्रत्येक सोसायटीत कचरा काढणारा जो माणूस असतो. त्यांच्या संघटना झाल्या आहेत. तो काय पिंपरी चिंचवडमधला नाही. ते पिंपरी चिंचवडमधले नाहीत. गाड्या धुणारी ही सगळी मंडळी

आहेत. त्यांचा चेहरा बघून कळेल. त्यांची संघटना झाली आहे. ही मंडळी पहाटे पाच वाजता येतात. आणि सोसायट्यांमधल्या सगळ्या गाड्या धुतात. याचे विपरीत जेव्हा घडणार आहे, त्यावेळी चित्र दिसणार आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही नुसते हे धोरण करुन चालणार नाही. यांच्याबरोबर बाकी अनंत आहेत. परंतू लोकांना काय झाले आहे. सोप्प आणि फुकट. आणि त्यामुळे कोणाला कोणत्या गोष्टीचे काहीही गांभिर्य नाही. प्रत्येक हातगाडीचा व्यवसाय हा शंभर टक्के प्रॉफीट असणारा व्यवसाय आहे. याबद्दल या हातगाडीवाल्यांचे कोणाचे काही म्हणणे आहे का. नाही, त्यांच्या नेत्यांचे हे म्हणणे आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही सांगा, चिकन किंवा चायनीजवाल्यांचा कचरा जर त्या कचराकुंडीत गेला. आणि शेजारी एखादे देऊळ असेल किंवा धार्मिक स्थळ असेल, आणि एखादा कावळा नॉनव्हेजचा तुकडा घेऊन त्या धार्मिक स्थळावर जातो आणि ते नॉनव्हेज खातो. त्या देवळातला माणूस त्या हातगाडीवाल्याला सांगतो, अरे, तुझा चायनीजचा कचरा लांब टाक. तो कावळा बघ, मंदीरावर येऊन बसतोय. तर लगेच त्या हातगाडीवाल्यांच्या संघटनेचा पुढारी तिथे येतो. आणि देवळातल्या लोकांशी भांडण करतो. मागील पंधरा दिवसांपूर्वी घडलेली ही घटना आहे. कोणते ठिकाण आहे हे मला सांगायची आवश्यकत नाही. माहिती घेतलीतर तुम्हाला दोन मिनिटांत कळेल. म्हणून साहेब, तुम्ही जे-जे केले आहे. तुम्ही बायोमेट्रीकपर्यंत पोचला आहात. हे त्या-त्या नगरसेवकांना विचारा. त्या-त्या नगरसेवकांना लेखी द्या. अतिक्रमण विभागात बदल्या करणे गरजेचे आहे. अधिकारी प्रस्थापित झाले आहेत. तीन वर्षे झाली आहेत. त्यांना दुसरीकडे टाका. हातगाडी, फूटपाथ यासाठी जेअधिकारी आहेत. त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी जाऊ द्या. सांगायचे तात्पर्य हेच की, प्रत्येक नगरसेवकाला त्याच्या-त्याच्या वॉर्डात पूर्वी खरेच ही मंडळी होती का. या टप-या खरेच २५ वर्षांपासून तिथे आहेत का. म्हणजे त्या नगरसेवकाने २५ वर्षे त्या टप-या काढायच्या. एखाद्या प्रामाणिक माणसाची खरेच तशी परिस्थिती असेलतर तो नगरसेवक सुद्धा म्हणतो, पन्नास हजार डिपॉझिट आहे का, मी देतो. तू तिथे धंदा कर आणि भाडे भर. त्यांना असे करू देत. गरजेचे नाही की तुम्ही प्रत्येकाला फिरती गाडी, हातगाडी पुरवा. प्रत्येक ठिकाणी, ठिकठिकाणी भाजी मंडई झाली आहे. मंडई ओस पडलेली असते आणि तुम्ही गाडीचे लायसन द्या. आतातर एक फॅशन आहे. चांगले फोर व्हिलरवाले गाडीतून भाज्या घेऊन येतात. रोज संध्याकाळी गाडी लावतो. भाजीची विक्री करतो. परत गाडीत टाकतो, निघून जातो. टेम्पोवाला तर होताच, आता फोर व्हिलरवाल्यांनी पण हा बिझनेस सुरु केला आहे. कपडे फोर व्हिलरमध्ये. आता काय करायचे हे नगरसेवकांना सांगा. यानंतर स्वतंत्र बैठक लावा. विभागवार बैठक लावा. प्रभागवार बैठक लावा. नंतर आमच्याकडे घेऊन या. तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवण्यात यावा.

**मा.नंदा ताकवणे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.अरुणा भालकेर**-मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर**-हा विषय तहकूब करण्यात येत आहे. अधिका-यांना सूचना आहे की, नगरसदस्यांनी ज्या सूचना मांडल्या आहेत, त्याचा अधिका-यांनी गांभिर्याने विचार करावा व शहराचा बकालपणा कमी होईल याची दक्षता घ्यावी.

यानंतर सूचनेप्रमाणेचा विषय मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ८८२ विषय क्रमांक-२
दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/२२/२०१६ दि.२३/०५/२०१६
२) मा.स्थायी समीतीकडील ठ.क्र.१६३८४ दि.७/६/२०१६

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-३
दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५३/२०१६, दि.०९/०२/२०१६
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६२ दि.१.०४.२०१६
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८४७ दि.२०/४/२०१६
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.८६५ दि.२०/५/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३, ३७६ व उपविधीनुसार उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाने देण्यात येतात.

सद्यस्थितीत या विभागामार्फत देण्यात आलेल्या एकूण परवान्यांची संख्या दि.३०/११/२०१४ अखेर ६१३९ एवढी आहे व सन २०१५-२०१६ मधील माहे नोव्हेंबर २०१५ अखेर

मिळालेले एकूण उत्पन्न र.रु.१५,८४,४५६/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख चौ-याऐंशी हजार चारशे छपन्न फक्त) एवढे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ चे तरतुदीस आधीन राहून प्रति वर्षी परवाना फीचे दर निश्चित करण्यात येतात त्यानुसार सन २०१६-१७ साठीही ते निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१३-२०१४ चे उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१२-२०१३ चे दरात १०% वाढ केलेली आहे. ही बाब विचारात घेता सन २०१४-२०१५ साठी कोणतीही फी वाढ न करता सन २०१३-२०१४ चे दर कायम ठेवण्यात आले आहेत. सन २०१५-२०१६ चे उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१४-२०१५ चे दरात १०% वाढ केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्रमांक पीसीसी-३०१५/प्र.क्र.७५(१)/नवि-२२ दिनांक २४/४/२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३ मध्ये महानगरपालिकेच्या अधिकारितेतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाव्दारे अधिसूचित केलेल्या क्षेत्रामध्ये कारखाने, कर्मशाळा किंवा कामाच्या जागेच्या बाबतीत अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही अशी सुधारणा केलेली आहे. त्यामुळे एम.आय.डी.सी. क्षेत्रातील उद्योगांना यापुढे म.न.पा. परवाने देता येणार नाहीत. तसेच म.न.पा.चे उत्पन्नाचे प्रमुख साधन एल.बी.टी. हे शासनाने रद्द केलेने म.न.पा. उत्पन्न वाढविण्यासाठी सन २०१६-१७ साठी प्रचलित सन २०१५-१६ दरामध्ये २०% दरवाढ उपरोक्त व्यवसाय व साठा परवान्यासाठी करणेत यावी. तसेच उद्योगधंदा परवान्यासाठी प्रपत्र अ प्रमाणे परवाना फी असे सूचविण्यात येत आहे. त्यानुसार सन २०१६-१७ साठी प्रस्तावित दर दर्शविणारे, उद्योगधंदा परवाना फी साठी प्रपत्र-अ, व्यवसाय परवाना फी साठी प्रपत्र-ब व साठा परवाना फी साठी प्रपत्र-क सोबत सादर केलेप्रमाणे मा.आयुक्त यांनी प्रस्तावित केले असले तरी उद्योगधंदा परवाना, व्यवसाय परवाना व साठा परवाना फी चे सन २०१५-१६ साठी निश्चित केलेले दर हे सन २०१६-१७ साठी कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.राजेंद्र जगताप-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य,हा जो विषय क्रमांक ३ आहे. या विषयाबाबतीत आकाशचिन्ह व परवाना विभाग किती उदासिन आहे, हे विषयाच्या माध्यमातून मी आपणासमोर दाखवू इच्छितो. महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर आकाशचिन्ह व परवाना या विभागात राज्य शासनाचे धोरण व नियमानुसार व बीपीएमसी ॲक्टमधील तरतूदीनुसार त्याची अंमलबजावणी सुद्धा झालेली नाही. वास्तविक महापालिका स्थापन झाल्यानंतर अधिकृत जाहिरातींची नोंद व्यवस्थित ठेवली जात नाही. कार्यवाही व्यवस्थित न केल्यामुळे महापालिकेचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले आहे, याला जबाबदार

कोण. प्रशासनाने जबाबदारी निश्चित का केली नाही. यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. हे आर्थिक नुकसान संबंधित अधिका-याकडून वसूल केले नाही. ते वसूल केले नसेलतर त्यांच्या वेतनातून ते वसूल करावे. पिंपरी चिंचवड महानगपालिकेमध्ये बिग इंडिया या नावाने चार/पाच फर्मस् आहेत. शहरात जाहिरात फलक लावले जातात. त्यात काही अधिकृत तर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत फलकांची संख्या असते. त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक नियोजनाला मोठा फटका बसतोय. शहरात जाहिरात फलकांचा लेटेस्ट सर्वे केला आहे का. केला असेलतर कोणत्या संस्थेने केला,त्याचे नाव द्यावे. अन्यथा त्रयस्थ संस्थेमार्फत संपूर्ण शहरातील सर्वे करण्यात यावा. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत ज्या जाहिरात संस्थांच्या नोंदी आहेत, त्यांचेच जाहिरात फलक आहेत का. आपल्या महानगरपालिकेचे प्रभाग व मुख्य कार्यालयातील जवळपास ८७ कर्मचारी वर्ग या सर्वेसाठी वापरला जातो. शहरात अनेक वर्षांपासून बिग इंडिया ग्रुपच्या नावाने सर्व परवानग्या दिल्या जातात. त्यांच्या ४५ फर्मस् आहेत हे कोणालाही माहित नाही. आपण पाहिले की, आत्तापर्यंत बिग इंडिया ग्रुपच्या हितेंद्र नरेंद्र हे नाव आपल्या सर्वांना, आकाशचिन्ह परवाना यांना माहित आहे. त्यांच्या जवळपास ४५ इतर फर्मस् आहेत ते कोणालाही माहित नाही. कारण याठिकाणी हितेंद्र नरेंद्र सर्वांत फेमस आहे. पिंपरी चिंचवड शहरातील जे ज्येष्ठ नागरीक आहेत, ज्येष्ठ नेते आहेत,त्यांचे होर्डींग लावतो. त्यांच्या वाढदिवसाच्या तारखा त्याच्याकडे आहेत. तो महापालिकेच्या अधिका-यांवर दबाव टाकून महापालिकेची लूटालूट करतो. याकरिता या नरेंद्रकडे आपण निश्चितपणे लक्ष दिले पाहिजे. मा.महापौर साहेब, आपण पाहिलेतर पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील रेटचे कम्पॅरीझन केलेतर आपल्याकडे रु.७.८०/- रेट आहे आणि पुणे महानगरपालिकेत रु.१८.५०/- रेट आहे. म्हणजे पुणे महानगरपालिकेचे याठिकाणी जवळपास रु.३० कोटी वार्षिक उत्पन्न आहे. आपल्याकडे रु.५ कोटी वार्षिक उत्पन्न आहे. तसे आपण करावे. आपण पुणे महापालिकेचे सातत्याने अनुकरण करत असतो. आपण पुणे महापालिकेचे अनुकरण करुन रिक्शा सीएनजी गॅस किटसाठी रु.१२,०००/- रुपये अनुदान दिले गेले. मला आठवतेय, आपण २०१२ मध्ये १० टक्के वाढ केली आहे. ती १० टक्के वाढ केल्यानंतर आपण आजतागायत त्यात वाढ केलेली नाही. यात महापालिकेचा जवळजवळ रु.१०.२० पैसे या दराने चार वर्षांचा लॉस झाला आहे. यात सर्वांत जास्त हितेंद्रचा हात आहे. आपण यात लक्ष दिले पाहिजे. शहरात पिंपरी चिंचवडमध्ये पिंपळे गुरव हा एकच प्रभाग आहे, इथे १० कि.मी., १८ कि.मी. चे रस्ते आहेत. व्यवसाय परवानाच्या माध्यमातून ३७६,३७७,३७८ याचा सर्वे केला आहे. त्या सर्वेप्रमाणे या प्रभागात २२ पीठगिरण्या आणि ६ लाँड्री अशा एकूण २८ व्यवसाय परवान्यांची नोंद झाली आहे. पिंपरी चिंचवड शहरात पाहिलेतर मला वाटते, ६१३९ व्यवसाय परवान्यांची नोंद आहे. याचा आपण कधी विचार करत नाही. शहराची लोकसंख्या २० लाख होणार असताना फक्त ६१३९ व्यवसाय परवान्यांची नोंद आहे. याचा आपण कधी विचार करत नाही. शहराची लोकसंख्या २० लाख होणार असताना फक्त ६१३९ व्यवसाय परवान्यांची नोंद आहे. अशा पद्धतीने आपण महापालिकेचा लॉस करत गेलोतर ज्या इतर संस्था आहेत. मी दोन जणांना विचारले, आपल्या परिसरात पिंपरी चिंचवडमध्ये तुमचा होर्डींगचा व्यवसाय आहे. त्यांनी मला सांगितले की, आम्ही हितेंद्र नरेंद्रला सगळे दिलेले आहे. त्यांच्याकडे चेक घ्यायला जातो. आम्हाला बाकीचे काही माहित नाही. तो आत्तापर्यंत व्यवसाय करतोय. त्याने

महापालिकेचे कोट्यावधींचे नुकसान केले आहे, याकडे कोणाचेच लक्ष नाही. मला आपल्याला सांगायचे आहे की, आपणही यात लक्ष द्यावे. कडूसकर साहेबांच्या जागी प्रभारी म्हणून माने साहेब आलेले आहेत. माने साहेबांनी जसे एलबीटीत लक्ष दिले आहे, तसा चांगल्या पद्धतीने कारभार इथे देखील व्हायला पाहिजे. कसे कसे व्यवसाय परवाने दिले जातात हे मला ३७६ च्या कलमानुसार सांगितले जाते. २८ प्रकारचे व्यवसाय परवाने मिळाले आहेत. शहरात १० कि.मी.चा रस्ता असेल तिथे कितीतरी दुकाने असतील. त्यांचा व्यवसाय परवाना काढला होता. व्यवसाय परवान्यासाठी किती नोंदी झाल्या, काय झाल्या, त्यांच्यावर काय कारवाई झाली याचा मला खुलासा मिळाला पाहिजे. या प्रश्नाचे गांभिर्य लक्षात घेऊन या प्रश्नाला जास्तीत जास्त महत्व दिले पाहिजे.

**मा.सिमा सावळे**-मा.महापौर साहेब, मा.राजेंद्र जगताप यांच्या तोंडातून चुकून कलम ३७६ असा शब्द निघाला आहे. त्यांनी हा शब्द मागे घ्यावा.

**मा.राजेंद्र जगताप-**मा.महापौर साहेब, मला कलम ३८६ असे म्हणायचे होते. मी कलम ३७६ हा वापरलेला शब्द मागे घेतोय.

**मा.सुरेश म्हेत्रे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, विषय आहे उद्योगधंदा व्यवसाय व साठा परवाना फीचा. परंतू मा.राजेंद्र जगताप यांनी फ्लेक्स बोर्डबद्दल जी माहिती विचारली होती, त्याबद्दल दोन्हीबद्दल मी बोलणार आहे. प्रथमतः मा.राजेंद्र जगताप यांनी जे विचारले आहे की, धिरेंद्र कंपनी व इतर संस्थांचे जे बोर्ड आहेत. अनेक बोर्ड अनधिकृत आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, हायकोर्टाने जो निर्णय दिला. शहराचा बकालपणा, विद्रुपीकरण हे कुठेतरी थांबवावे. म्हणून फ्लेक्स बोर्डवर बंदी घाला. या निर्णयाला अनुसरुन जे अनधिकृत फ्लेक्स लावतात,त्यांच्यावर बंदी घालण्यासाठी अतिक्रमण विभागाला आदेश दिलेले आहेत. परंतू आजही शंभर टक्के फ्लेक्स काढायचे काम जे नागरीक किंवा कार्यकर्ते लावतात,ते होत नाही. जे बोर्डवाले आहेत, ते अधिकृतरित्या आपल्याकडून परवाना घेतात. त्यांचेही काही बोर्ड अनधिकृत असल्याचे चर्चेतून, आकडेवारीतून दिसून येते आहे. ते अनधिकृत का करतात. जे अधिकृत बोर्ड ज्यांचे लायसन घेतले होते, याचीही काही कारणे आहेत. तीन महिन्यांपूर्वी एका कार्यकर्त्याला बोर्डाचे लायसन नाही म्हणून परवाना विभागाकडून संबंधित लायसन घ्यायला लावले. जागा भाडे व फी मिळून वर्षाची फी रु.९०,०००/- आहे. आता त्याला जाहिरात मिळत नाही. परंतू रु.९०,०००/- फी भरून त्यांनी बोर्ड उभा केला आहे. स्ट्रक्चरसाठी खर्च केला होता. त्याशेजारी तीन/तीन अनधिकृत फ्लेक्स लागतात. त्यांच्यावर कारवाई होत नाही. मग हा काय करणार. मग त्याचीही मानसिकता अनधिकृत फ्लेक्स लावण्याकडे वळते. हे मुख्य कारण आहे. बोर्डची साईज १५x२० देतो. मी कडूसकर साहेबांशी या विषयावर बोललो. साईजमध्ये कमी केले पाहिजे. अनेक कार्यकर्ते असतील, नागरीक असतील, ते वाढदिवसाचे बोर्ड लावतात. १०x१२, १०x१५ अशा साईजचे बोर्ड लावतात. एकाच स्ट्रक्चरवर कमी साईजचे बोर्ड लावायला मान्यता द्यावी. म्हणजे वाजवी दर ठेऊन अनधिकृत बोर्ड बाजूला लागतात त्याच्यावर नियंत्रण येईल. पुढील विषय आहे. महापालिका जागांची फी घेतो, ती कमी असणे गरजेचे आहे. तुमची परवाना फी कमी आहे. परंतू जागा भाडे एवढे आहे की ते न

परवडण्यासारखे आहे. म्हणून अधिकृत लायसन घेणारे अनधिकृतकडे का वळतात याचे कारण आहे. हे गांभिर्याने घेऊन तुम्ही यांची मानसिकता का होते याचा सुद्धा विचार केला पाहिजे. मुळ विषय जो आहे, उद्योगधंदा, व्यवसाय व साठा परवाना यात जी वाढ केली. सन २०१२-१३ ला १० टक्के वाढ केली. सन २०१३-१४, सन २०१४-१५ मध्ये वाढ केली नाही. परत सन २०१४-१५ मध्ये १० टक्के वाढ केली. आत्ता विषय आला आहे. एमआयडीसीच्या, शासन नियमानुसार त्याठिकाणी परवान्यांची आवश्यकता राहणार नाही. उद्योगधंदा परवाना व साठा परवाना हा कायम आहे का. याबद्दल माहिती मिळणे गरजेचे आहे. जर साठा परवाना असेलतर गोडाऊन २०,००० स्क्वे. फूटाचे आहे. त्याचा मिळकत कर तुम्ही घेताय. परत साठा परवाना पण घेताय. असा दुहेरी टॅक्स घेता येतो का. अशा प्रकारचे आहे का. करता येईल का. २०,००० स्क्वे. फूटाचे गोडाऊन असेलतर त्याचा साठा परवाना का घ्यायचा. जर प्रॉपर्टी टॅक्स मिळत असेलतर टॅक्स का घ्यावा. डबल का घ्यावा. मोठ्या मोठ्या कंपन्या असतील त्यांचे रॉ मटेरीयल ठेवायचे असेल,उद्योजक असतील तर त्यांना त्याठिकाणी आपले यार्ड ठेवावे लागते. प्रामुख्याने मार्केटमध्ये जाणे, बाजारात जाणे यासाठी काही कालावधी जावा लागतो. यात लोखंडा माल येतो, इलेक्ट्रॉनीकचा माल येतो. तो पावसाळ्यात कुजून जाऊ नये, डॅमेज होऊ नये म्हणून कंपन्यांना गोडाऊन असणे गरजेचे आहे. मग असे असताना त्यांनी साठा का करु नये असे माझे मत आहे. आपण मोकळ्या जागेचा सुद्धा प्रॉपर्टी टॅक्स आकारतोय. परंतू या ठिकाणी सुद्धा डुप्लिकेशन होईल. आपण मोकळ्या जागेला काही प्रमाणांत सूट देऊन जर टॅक्सची आकारणी करतोय. तिथे शेड मारली. मालाचे संरक्षण मिळते. मिळकत कर मिळतोय व साठा परवाना पण मिळतोय. हे कुठेतरी चुकीचे वाटतेय. म्हणून आपण यात व्यवस्थितरित्या माहिती घेऊन साठा परवाना हा प्रकार माझ्या मते उद्योग व्यावसायिकांना, कमर्शियल दुकाने यांना लागू करावा. ५०० स्क्वे.फूटाचे दुकान असते. त्या दुकानात चार/पाच कामगार असतात. माल विकला जातो. इतर स्टॉक जास्त रहात नाही. त्या व्यावसायिकाचा धंदा आणि पाच/दहा गुंठ्यांत उद्योगधंदा करणारा, यांची तुलना करा. प्रॉफिट मार्जिनचाही विचार करा. त्या व्यावसायिकाची बॅलन्सशिट पहा. इथे कुठेतरी संशोधन करायला पाहिजे. इथे कुठेतरी अन्याय होतो आहे. म्हणून हा अन्याय दूर करण्यासाठी साठा परवाना हा महत्वाचा विषय आहे. साठा परवान्याबाबतीत फेरविचार करुन आपण धोरण बदलावे. जसे एमआयडीसीतील लोकांनी परवाने काढले होते. व्यवसायाचे लायसन हे कामगार वर्गावर दिले जातात. तळवडे, चिखली हा एरिया औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केला आहे. त्याठिकाणी हा विषय प्रलंबित आहे. म्हणून या विषयी आपण कोणता व्यवसाय करतो, त्या प्रकारे लायसन असणे गरजेचे आहे. ५० कामगार, २० कामगार त्यानुसार फी आकारली जाते. त्यामध्ये बदल होणे गरजेचे आहे. त्याठिकाणी अनेक प्रकारच्या कंपन्या आहेत. त्याठिकाणी व्यवसाय काय करतात याचे लायसन असणे गरजेचे आहे. त्याठिकाणी चुकीचा व्यवसाय होऊ नये. दुसरे म्हणजे स्क्रॅपचा व्यवसाय. स्क्रॅप व्यवसायाबाबतीत केमिकल, कागद कसे मिक्स होतात त्यांना काही कळत नाही. आणि मग घटना घडतात. बॅरलमध्ये ज्वलनशील केमिकल आहे का साधे आहे. आणि मग कुठेतरी त्याला काडी लागून किंवा आग लागून ते पेट घेते. तळवडे इथली अनेक दुकाने जळली आहेत. त्याठिकाणी साठा परवाना आहे. मिळकत कर मिळत असेलतर तिथे जरुर याची तपासणी करुन कुठेही डबल टॅक्स होणार नाही याची

काळजी प्रशासनाने घ्यावी. रेट न वाढवता ऍज ईट ईज विषय करायचा आहे. विषय भरपूर फिरवला आहे. २०१२ सालापासून विषयात निश्चित आकडा नाही. विषय नीट कळत नाही. मा.आयुक्तांनी प्रस्तावित केलेले २० टक्के दरवाढीचा विषय आहे. सन २०१५-१६ चे दर आहेत त्यात २० टक्के दरवाढ सादर करणे असे आयुक्त साहेबांनी प्रस्तावित केले आहे. तरीसुद्धा परवाना फी सन २०१५-१६ साठी निश्चित केलेले दर सन २०१६-१७ साठी कायम करण्यास मान्यता द्यायची आहे. म्हणजे यात कोणतीही वाढ नाही याचा असा अर्थ आहे. पूर्वी जी फी सूचवली होती ती आहे तशीच ठेवायची असे म्हणताय. आणि त्यात २० टक्के दरवाढ करायची आहे असेही म्हणताय. म्हणजे नक्की काय म्हणताय. निश्चित काय प्रकार आहे. म्हणून मी खुलासा मागतोय, याची निश्चित माहिती द्या. म्हणजे परत चर्चा करता येईल.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य,याचा खुलासा करावा.

**मा.डॉ.माने(सहा.आयुक्त,आकाशचिन्ह व परवाना)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, सन २०१६-१७ चे आर्थिक वर्षाकरिता उद्योगधंदा, व्यवसाय,साठा परवाना फीच्या मान्यतेसाठीचा हा विषय आहे. पहिला जो आहे, उद्योगधंदा, साठा परवाना फी. सन्मा.नगरसदस्यांनी सांगितल्याप्रमाणे यापूर्वी आपण उद्योगधंदा फि कर्मचा-यांच्या संख्येवर आधारीत आकारत होतो. यावेळी जे प्रस्तावित केले आहे ते क्षेत्रफळाला अनुसरुन प्रस्तावित केले आहे. पूर्वी कर्मचारी संख्येला अनुसरुन होते. दुसरे आहे ते, व्यवसायासाठी, ट्रेडींगसाठी जी परवाना फी आहे ती सन २०१५-१६ मध्ये आकारली होती. परंतू त्यावेळी ती वाढ सभागृहाला मान्य नव्हती. सन २०१६-१७करिता ही वाढ गृहित धरुन सन २०१६-१७ च्या मान्यतेसाठीचा तो प्रस्ताव आहे. तिसरे म्हणजे साठा परवाना. मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे साठा परवान्याची जी फी आहे, त्यात कोणत्या वस्तूसाठी साठा परवाना घेतो याचे परिपत्रक/प्रपत्र बनवलेले आहे. यात मुख्यत्वे डायनामाईट,फिलॅमेंट ऑफ मर्क्युरी,प्लास्टीक पावडर, गनकॉटन, नायट्रोग्लिसरीन, फॉस्फरस, विडीची पाने, कापूर, सेल्यूलॉईड, सेल्युडायनामार, चलचित्र फिल्म,खराब कापूस, खोबरे, सरकी, वाळलेली पाने, बंदुकीची दारू, आगपेट्या, अपेय स्पिरीट, रंगपेन, कागद व रद्दी, पेट्रोलियम प्रॉडक्ट, तेल, गंधक, गळीतीची धान्ये, टार,पीच, टर्पेंटाईन, वॉर्निश या हेडखाली साठा परवाना देतो आहे. त्याची क्वांटीटी व त्याचे स्वरुप कळावे म्हणून हे फीचे स्ट्रक्चर आहे. तीन प्रपत्र आहेत. पहिला प्रपत्र आहे ते उद्योगधंदा परवानगीसाठी आहे. पूर्वी आपण कर्मचारी संख्येच्या आधारावर करत होतो. ते बदलून आता जागेच्या स्क्वे. फूटाच्या स्वरुपात आकारणी करण्यासाठी आहे. त्याचा दुसरा भाग आहे जो ट्रेडींग परवाना फीच्या संदर्भात आहे. मागील वर्षापेक्षा २० टक्के वाढ करून करतोय. तिसरे आहे, साठा परवाना कोणत्या प्रकारचा आहे हे आपल्या लक्षात यावे. त्याची मोजदाद आपल्याकडे असावी या उद्देश्याने ही फी आकारणी करतोय.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, एका बाजूने बघितले तर हा विषय शहराच्या दृष्टीकोणातून गांभीर्याचा आहे. कारण आपण एका बाजूला आकाशचिन्ह परवाना विभागाकडे उत्पन्नाचे साधन म्हणून बघत असू तर शासनाला एकिकडे एलबीटी रद्द करावी लागली आहे. हे करत असताना आपली महापालिका जी संपूर्ण जगात स्वयंभू

महापालिका आहे. जिला अतिशय चांगले उत्पन्नाचे स्त्रोत आहेत. ते कमी होत असताना हा विभाग आहे. या विभागाचे उत्पन्न मात्र अपेक्षेपेक्षा कमी आहे. आमचे मित्र मा.राजेंद्रभाऊ जगताप यांनी विचारलेला प्रश्न आहे. ही महापालिका या शहरात आकाशचिन्ह वगळता उद्योगधंदा व्यवसाय परवाना लागू करतेय. या शहरात गेल्या काही वर्षांत आपली लोकसंख्या पाहता शहराच्या विकासाचा दर ७२ टक्के आहे. संपूर्ण भारतात एवढ्या मोठ्या प्रमाणात विकास केलेली दुसरी महापालिका नाही. याचा अर्थ आपली महापालिका केवळ इन्फ्रास्ट्रक्चरच नाही,लोकसंख्या बघा,व्यवसाय बघा, परिसर बघा याची वाढ इतक्या मोठ्या प्रमाणात होत असेलतर महानगरपालिकेचे या विभागाकडून वसूलीचे प्रमाण सुद्धा तेवढ्याच टक्यांवर जाणे अपेक्षित आहे. साधी व सोप्पी शंका आहे. यावर काही शासनाच्या गाईडलाईन्स आहेत. शासनाने ठराविक गट करुन दिले आहेत. तुम्हाला त्यासाठी याप्रमाणे व्यवसायाची निवड करावी लागते. तुमच्या विभागासाठी महापालिकेला काही अधिकार आहेत का. यात बदल केला जाऊ शकतो किंवा महापालिका सभेची मान्यता घेऊन व्यवसाय परवान्यांना त्या व्यवसायाच्या बदल्यात फि आकारणीचा निर्णय, ती लागू करायचा निर्णय महापालिका स्तरावर होऊ शकतो का. असे असेलतर या महापालिकेच्या मान्यतेने आपल्या विभागाच्या उत्पन्नात भर पडू शकेल काय. दुसरी गोष्ट शासनाने तुम्हाला ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या फार जुन्या आहेत. त्यात वर्षानुवर्षे रिव्हिजन झालेले नाही. बरेच व्यवसाय असे आहेत. आमचा नुसता ड प्रभाग जरी घेतला, नुसते पिंपळे सौदागर घेतले तरी आम्ही बघतो. कमीत कमी २५०० अधिकृत दुकाने असतील. त्यापैकी किराणा मालाच्या दुकानाला तुमच्याकडे माफक दर आहेत. त्यांना महापालिका परवानगीची गरज नाही. इतर शॉपिंग स्टोअर्स, सुपरशॉपी शंभर तरी असतील. अशा ठिकाणी तुम्हाला परवाना लागत नाही. दुकानदार पण हुशार असतो तो काय करतो, परवाना लागणार नाही असा व्यवसाय समोर ठेवतात. आपली लोकं परत येतात. तुम्ही सांगताना काय सांगणार, त्यांनी आम्हाला हा व्यवसाय दाखवला. कोणताही व्यवसाय असू द्यात, झिरो बिलींग करा. त्याची पाणीपट्टी असेल, तो टॅक्स तर भरतो ना. त्याचा व्यवसाय परवाना हा व्यवसाय परवाना फीच्या कक्षेत येत नसेलतर त्याला झिरो बिलींग झाले पाहिजे. तर तुम्हाला याच्यावर कंट्रोल येईल. आपल्या महापालिकेत आज जवळपास पाच ते सहा लाख मिळकती आहेत. त्यापैकी २५ ते ३० टक्के व्यवसायीक मिळकती शंभर टक्के आहेत. तसा रेशियो पाहिलातर लाख/दीड लाख व्यावसायिक स्वरुपाचे असले पाहिजेत. मान्य आहे, तुम्हाला काहीतरी शासनाचे बंधन आहे. परंतू आपण यातून महापालिकेचे महत्वाचे उत्पन्नाचे साधन गमावतोय. या गोष्टीला केवळ हा विभाग जबाबदार आहे असे मला तरी वाटते. एका बाजूला आपली करसंकलन प्रणाली आहे. त्या टॅक्स कलेक्शन डिपार्टमेंटमधून याचे डिटेल्स आपल्याला मिळू शकतील. तुम्हाला कोणाला विचारायची पण गरज नाही. पूर्वी जकात असताना किंवा एलबीटी असताना तुम्हाला लोकांच्या दुकानांत जाऊन सर्वे करायला लागत होता. जिथे कमर्शियल टॅक्स लागू झाला आहे, तिथेच फक्त जायचे. माझ्या मते हा अतिशय चांगला उपाय आहे. कमर्शियल मिळकत असेल तर तो आपोआप परवाना विभागाला ॲटॅच होईल. तुम्ही ॲटॅच करा. जेव्हा जीआयएस होईल. तेव्हा आपल्या मिळकतींचे स्वरुप एकमेकाला कनेक्टेड झाले पाहिजे. एकमेकांना जबाबदार झाले पाहिजे. पण आमचे कोणी ऐकतच नाही. मी संबंधित लोकांना कितीतरी वेळा सांगितले, तुम्ही नुसते टॅक्ससाठी ई-टॅपिंग करु नका. तुम्हाला या गोष्टी

सोप्या होणार आहेत. जिथे मिळकतींची नोंद आहे. निवासी व बिगरनिवासी अशा दोन प्रकारच्या नोंदी करतो. जिथे बिगर निवासी करतो, तिथे शंभर टक्के विचारतात. परवाना विभागाची एनओसी घेणे बंधनकारक असेलतर आपल्याला या विभागाचे उत्पन्न काही न करता कमीत कमी २५ टक्के वाढणार. हे मी आज रेकॉर्डवरुन बोलतोय. याकडे आपण जाणिवपूर्वक लक्ष द्या. केवळ या विभागाची प्रश्नोत्तरे विचारली म्हणून या विभागाला ५ कोटी किंवा ७ कोटींच्या मर्यादेपर्यंत ठेवू नका. सात हजारचे साठ हजार कसे होतील याकडे लक्ष द्या. आपण केवळ मिळकती वाढल्या, मिळकती वाढल्या म्हणतोय. पण टॅक्स बुडवणारे पण तेवढेच आहेत. परंतू टॅक्स लावणारे पण कामचुकार आहेत असा त्याचा अर्थ होतो. पण ते न रहता आपल्याला ई-टॅपिंग झाले पाहिजे. करसंकलन प्रणालीत जाहिरात परवाना हा विभाग जोडला गेला पाहिजे. त्यात झिरो बिलिंग आले पाहिजे, अशी सुधारणा करायची सूचना याप्रसंगी देतो. याचा अवश्य विचार करा. मला माने साहेबांकडून खुलासा हवा आहे की, महापालिकेला परवाना देता येईल अशी तरतूद मा.महापालिका सभेत आहे का. तसे आपण करु शकतो का. जेणेकरुन महापालिकेला भविष्यात तो लागू करता येईल. धन्यवाद.

**मा.डॉ.माने(सहा.आयुक्त,आकाशचिन्ह व परवाना)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ३१३, ३७६ व त्याअंतर्गतच्या उपविधीनुसार उद्योगधंदा, व्यवसाय, साठा यासाठी परवाना देण्याची तरतूद आहे. याच्या अधिनियमातील कलम ३८६ च्या तरतूदीच्या अधिन राहून प्रतिवर्षी या गोष्टीसाठी परवाना फी दर निश्चित करायचे अधिकार आपल्याला आहेत.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, शासनाने जे आयटम दिलेले आहेत. त्याव्यतिरिक्त महापालिका सभेचे अधिकार वापरून, शासनाला विचारायचेच नाही, असे व्यवसाय परवाने डायरेक्टली देऊ शकतो का.

**मा.डॉ.माने(सहा.आयुक्त,आकाशचिन्ह व परवाना)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, आपल्याला आयटम लिस्ट मॉडीफाय करायचे अधिकार आहेत का असे तुम्हाला अपेक्षित आहे. जी आत्ता वाचून दाखवली ती लिस्ट होती. आयटम लिस्ट तपासावी लागेल.

**मा.प्रशांत शितोळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, त्याचा अभ्यास करा. माझे म्हणणे काय, जर यात आयटम वाढवता येत असतीलतर ते महापालिकेला निश्चितच फायद्याचे ठरेल. कायदेशीर नसणार असे नक्कीच नसणार. तुम्ही आयटम लिस्ट वाढवण्याबाबतीत तपासणी करून बघा. माझी मा.महापौर साहेब यांना विनंती आहे की, महापालिकेचा फायदा होत असेलतर त्याप्रमाणे हा विषय मंजूर करा. आयटम लिस्ट वाढवता येत असेलतर नक्की वाढवा.

**मा.सुरेश म्हेत्रे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य,आत्ता प्रशांतरावांनी सांगितले की, सर्वच प्रकारच्या व्यवसायिकांना आपल्याला यात कसे घेता येईल. आपले उत्पन्न वाढवण्यासाठी प्रत्येकाला परवान्यात कसे ओढता येईल. जसे शॉप ऍक्ट लायसन

काढल्यानंतरच बँकेचे खाते उघडून देतात. तसे सर्वप्रकारचे व्यवसाय या लिस्टमध्ये कसे येतील याचा कायदेशीररित्या अभ्यास करुन पुढील वेळी सादर करावे.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, अजून एका गोष्टीचा खुलासा केला गेला पाहिजे, रेडझोनमध्ये ज्या मिळकती आहेत, त्यांचा टॅक्स तुम्ही घेता. यात साठा परवाना द्यायला लोक करत आहेत. जसे तळवडे असेल, एमआयडीसी असेल, तिथे साठा करण्यासाठी परवानगीच देत नाही. मग अनधिकृत,पूर्वीची जी घरे आहेत, तिथे टॅक्स लावतो. आत्ता ऑलरेडी बांधलेली जी घरे आहेत, तिथे लोकांचा बिझनेस चालू आहे. त्यांना साठा करायला परवानगी का नको द्यायला. आज आपण ब-यापैकी सुविधा सुद्धा दिल्या आहेत. लायसन रिन्युएशन करत नाही. साठा करायला परवानगी देत नाहीत. या गोष्टीचा सुद्धा अभ्यास झाला पाहिजे. कारण आम्ही त्यादिवशी मिटींगमध्ये बोलवून घेतले होते. माझ्या माहितीप्रमाणे एक/दोन गोष्टींसाठी सहा महिन्यांपूर्वी फोन केला होता. त्यांनी स्पष्ट सांगितले,रेड झोन हद्दीत रिन्युएशन करत नाही. म्हणजे ते रिन्युअल होत नाही. आपली फी पण जाते. परंतू ऑलरेडी सगळे काम चालू आहे. आपण साठा करायला परवानगी देत नाही. त्याचे पैसे जातात. व्यवसाय करणारे तिथे शंभर टक्के फायदा कमावतात. फेरीवाले पैसे कमावतात. महापालिका मात्र आहे तिथेच आहे. जसे एलबीटी बाबतीत धोरण घेतले. तुमची चार/पाच जणांची टीम आहे. एकमेकांचा सल्ला घेऊन एलबीटीप्रमाणे यात कसे काय चांगल्या पद्धतीने करता येईल, शहराच्या दृष्टिकोणातून धोकादायक असतीलतर त्यांच्यावर कसे बंधनकारक करता येईल ते पहावे. आत्ता कुदळवाडीत जेव्हा आग लागली तेव्हा ती केमिकलने पसरली. तिथे कोणत्या गोष्टीने आग पसरली. तिथे कशाचा साठा होता. तिथे दहा बंब गेलेतरी ती आग विझली नाही. या सगळ्या गोष्टींचा तिथे विचार झाला पाहिजे. तिथे शेडस् आहेत तिथे ऑलरेडी बिझनेसचे सगळे काम चालू आहे. तिथे रिन्युएशन करत नाही. तिथे रिन्युएशनची गरज नाही याचा अर्थ काय आहे. रिन्युएशन केलय का नाही हे तिथे तुम्ही बघायला जात नाही. कामे चालायची पद्धत आहे त्या पद्धतीने तिथे कामे चालूच आहेत. तिथे साठा सुद्धा आहे. तुम्ही परवानगी दिली नाही. पण तिथे काही घटना घडलीतर तुम्ही काय म्हणणार, आम्ही तिथे साठा करायला परवानगी दिली नव्हती. नुसते म्हणून उपयोग नाही. आपल्याला कळाले पाहिजे तिथे किती साठा होतो आहे. किती गोष्टींचा कोणत्या प्रमाणात साठा होतो आहे याचे महापालिकेला कळाले पाहिजे. याची माहिती घेऊन सविस्तर विषय द्या. तुम्ही आम्ही विषय मंजूर करु, तोपर्यंत हा विषय तहकूब करण्यात यावा.

**मा.सुरेश म्हेत्रे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.अस्लम शेख** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ८८३ विषय क्रमांक-३
दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५३/२०१६, दि.०९/०२/२०१६
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६२ दि.१.०४.२०१६
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८४७ दि.२०/४/२०१६
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.८६५ दि.२०/५/२०१६

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.भारती फरांदे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८८४ विषय क्रमांक-४
दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.लेखा/०८/कावि/२६७/२०१६ दि.०४/०६/२०१६

सहसंचालक (म.न.पा.ले.प) स्थानिक निधी लेखापरिक्षा, रायगड भवन, ७ वा मजला सेक्टर-११, नवी मुंबई-४००६१४. (शासकीय ऑडीट) यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभांगाचे सन २०१२-२०१३ चे लेखापरिक्षण केलेले असून त्यांनी त्यांचे अहवालामध्ये विभागनिहाय एकत्रित १५० परिच्छेद उपस्थित केलेले आहेत. त्याकामी संबंधित विभागांकडून परिच्छेदांची पूर्तता करुन घेणेत आलेली आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० चे नियम १०(१) अन्वये मा.सहसंचालक (मनपालेप) स्थानिक लेखा परिक्षा, नवी मुंबई यांचेकडे अनुपालन पुर्तता अहवाल सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.भारती फरांदे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८८५ विषय क्रमांक-५
दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.आरोग्य/२/कावि/२९२/२०१६ दि.०८/०६/२०१६

देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४ पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या " स्वच्छ भारत अभियान" च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२३/नवि/३४,दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१५ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५ अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | ८४,९६,०००/- | १,६९,८८,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ११,५६,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्रअभियानाचे ब्रँडिंग ( माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती ) | ५,९०,०००/- | १,९७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ५०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | **एकूण** | **१,२७,०३,०००/-** | **१,८३,९१,००० /-** |
| | | **केंद्रशासन व राज्य शासन एकूण अनुदान** | **३,१०,९४,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक ३०/४/२०१६ अखेर प्रपत्र "अ " प्रमाणे कामकाज झालेले आहे.शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९/११/२०१५ अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्व साधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्व साधारण सभेमध्ये घेण्यात यावा" असे कळविलेले आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/५/२०१६ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ४९४८ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ४४६१ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ३४०० | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | १७७९ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | १६५४ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ७६२ सिटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ३२८१ लाभार्थी | GOI+GOM= १९६.८६ लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ६५.६२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **२६२.४८ लाख** | |

| | | | |
|---|---|---|---|
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ६९० लाभार्थी | GOI + GOM=४१.४ लाख | GOI = २०००/- व GOM= ४०००/-हिस्सा |
| | | ULB = १३.८ लाख | ULB २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५५. २ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.वैशाली काळभोर-**मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.झामाबाई बारणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आपण स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत प्रत्येक वॉर्डमध्ये स्वच्छतेसाठी अभियान राबवतोय. आरोग्यासाठी स्वच्छ शहर पाहिजे असेलतर प्रत्येक वॉर्डमध्ये स्वच्छता अभियान राबविले आहे. मला एवढेच सांगायचे आहे की, आपण स्वच्छतेसाठी एवढे प्रयत्न करतोय. काही वार्डांत आरोग्यची स्थिती धोकादायक आहे. त्या भागात हे काम करु शकत नाही. मी याआधीही तीन/चार वेळा ड्रेनेजबाबत बोलले आहे. दौलत पाटिलनगरमध्ये खूप जुन्या ग्रामपंचायतीपासून असलेल्या चाळी आहेत. आम्ही प्रत्येक वेळी सांगत असतो. अधिकारी येऊन पाहतात. तिथे काम करायला काही अडचण नाही. त्या भागात जे चेंबर तुंबले आहेत. त्यामुळे अक्षरशः लोकांच्या बाथरुममध्ये मैला येत असतो. त्यासाठी काहीतरी सुविधा करायला पाहिजे. आपल्याकडे गाड्या नाहीत. लोक तेवढ्यापुरते ड्रेनेज साफ करतात. माती पडली की परत दुस-या दिवशी चेंबर जाम होते. असे किती दिवस चालणार आहे. अनेक वेळा व्हिजिट दिली आहे. मा.आयुक्त साहेबांनी पण पाहणी केली. अधिकारी वरच्यावर येऊन पाहतात. त्याठिकाणी आता काही काम करता येत नाही. एक छोटा प्लॉट आहे. जर त्या प्लॉटमधून मेनरोडला लाईन काढली तर, पाण्याचा निचरा आपोआप होणार आहे. तो प्लॉट कोणाचा आहे, काय आहे ते माहित नाही. आपण अनेक ठिकाणी कारवाई करतो. या कामाला किती जागा लागेल. त्या प्लॉटचा मालक कोण माहित नाही. तिथे खोदाई सुरु केली तर कोण मालक आहे तो पण येईल. आज वाकड गावात पण हिच परिस्थिती आहे. तिथे खोदाई सुरु केली तर त्या जागेचा मालक पुढे आला. आज पावसाळा सुरु झाला आहे. त्या लोकांना अक्षरशः रात्रभर उभे रहावे लागते. लहान मुले आहेत. मटेरियल भिजलेले असते. आम्हाला दोन/दोन वाजेपर्यंत तिथे जावे लागते. चार वर्षे झाली. त्या भागात ड्रेनेजचे काम झाले पाहिजे. या आठवड्यात हे काम झाले पाहिजे. परवा सुद्धा येऊन ते काम पाहून गेले आहेत. तरी तिथे कारवाई झाली नाही. आत्ता सुद्धा मी इथे बसल्यावर मला तीन/चार वेळा फोन आला आहे की, चेंबर जाम झालेले आहेत. पाणी घरांत येते आहे. दुर्गंधी सुटलेली आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही आत्ता जरी आलात तरी दिसेल. हे काम लवकर झाले पाहिजे. नाहीतर सर्व लोक येऊ. आत्तासुद्धा, पूर्वी सुद्धा त्या भागातल्या लोकांनी ब-याच वेळा अर्ज केला होता. ब प्रभागांत हे काम लवकर झाले पाहिजे. नागरीकांचे किती सहन करायचे, मला याठिकाणी हेच सांगायचे आहे. हे काम लवकर झाले पाहिजे.

**मा.आशा शेंडगे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,खरेतर आज याठिकाणी स्वच्छता अभियान अंतर्गत आपण ओपन लिटीगेशन टाळण्यासाठी मागेल त्याला शौचालय असे केंद्र शासनाने, राज्य शासनाने व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या तिहेरी संगमातून हे काम चालू आहे. या अडचणी आपण चांगल्या प्रकारे दूर करतोय. हे सगळे निश्चितच कौतुकास्पद आहे. परंतू आत्ता जसे मा.झामाबाई बारणे म्हणाल्या. त्यांनी जी तळमळ मांडली ती सगळ्याच प्रभागांतील नगरसेवकांची तळमळ असणार आहे. आज आपण सगळ्यांनाच टॉयलेट ब्लॉकस् देतो तिथून जो मैला जाणार आहे, त्यासाठी लागणारी ड्रेनेजची केलेली व्यवस्था अत्यंत बिकट, अत्यंत तुटपूंजी आहे. आज कासारवाडीत हिराबाई झोपडपट्टी आहे. तिथे शेल्टरच्या माध्यमातून ७५ संडास ब्लॉक बांधण्यात आले. ७५ संडास ब्लॉक बांधल्यानंतर तिथे जी ड्रेनेज लाईन आहे ती कुठे जोडायची हा प्रश्न आहे. मग तिथे असणा-या गोल चेंबर्समध्ये जी ड्रेनेज लाईन आहे ती शोधायचा आम्ही प्रयत्न केला. पंधरा दिवसांपूर्वी शहरात जो पाऊस झाला, त्यातून सगळ्या लाईन्स चोकअप. जर अशी अवस्था असेलतर आम्ही नगरसेवक म्हणून कामकाज पाहत असताना आमच्या वॉर्डातले जे नागरीक आहेत, त्यांना काय उत्तर द्यायचे. आम्हाला उत्तर द्यायचा काय अधिकार आहे. ज्यावेळी अधिका-यांकडे चौकशी केली असता कळाले. तुम्हाला सगळ्यांना इतिहास माहिती आहे. सभागृह त्याला साक्षीदार आहे. बेबलेट नावाच्या संस्थेला ड्रेनेजचे काम दिले होते. त्या संस्थेने ७ वर्षांचा करार केला होता. त्यांनी आपल्याला गुंडाळले, किती गुंडाळले हे सभागृहाने अनेक वेळा सांगितले आहे. त्यानंतर दोन वर्षांपूर्वी नवीन संस्थेला काम द्यायचे ठरले. त्यावेळी प्रचंड पाठपुरावा करुन त्यांनी त्यात जीपीआरएस सिस्टीम बसवली. सगळ्या गोष्टींची मागणी केली. ही मागणी काही प्रमाणात पूर्ण देखील झाली. परंतू अशी अवस्था झाली आहे की, क प्रभागात काम करणारा अंकिता नावाचा कॉंट्रॅक्टर आहे. त्याने महापालिकेला दीड/दोन महिन्यांपूर्वी चक्क पत्र दिले आहे की, मला हे काम करता येणार नाही. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर त्याने प्रभागाला पत्र दिले असेल तर त्याच्यावर कारवाईची प्रोसेस झाली पाहिजे. एक साधी बीडींग मशीन मागवायची असेल किंवा रॅम्प मशीन मागवायची असेलतर या अधिका-यांचा आठ/आठ दिवस पाठपुरावा करावा लागतो. नको तेवढ्या वाईट शब्दांत अधिका-यांशी बोलावे लागते. यात आमचा मोठापणा असतो असा अजिबात भाग नाही. आम्हाला नागरीकांना तोंड द्यावे लागते. आम्हाला अधिका-यांनी त्या पद्धतीने काम करुन दिलेतरच आम्हालाही प्रभागात फिरण्याचा सन्मान मिळवता येतो. मी मागील वेळी मा.अंबादास चव्हाण यांची भेट घेतली होती. त्यांनी सभागृहाला सांगावे की, मागील दीड महिन्यात पाठपुरावा केल्यानंतर आज आपण कोणत्या स्टेजला आहोत. त्या ठेकेदारावर आपण काय कारवाई केली. नुसती कारवाई करुन प्रश्न सुटणार नाही. ती कारवाई केल्यानंतर आपण कोणाला काम दिले आहे. सगळ्या नगरसेवकांची हिच बोंब आहे. मी फोन केला की, मला सांगतात, ताई वल्लभनगरला गाडी आहे. आत्ता गाडी येईल. असे सांगून तो दिवस-दिवस आम्हाला खेळवतो. अशाप्रकारे आम्ही नगरसेवक असून सुद्धा काम होणार नसेल. मी अनेक वेळा सांगितले, दीड महिन्यांपूर्वी पत्र दिले होते. मा.अंबादास चव्हाण यांच्याशी तोंडी बोलले नाही. जे एक्झिक्युटीव्ह म्हणून अधिकारी आहेत, त्यांच्याशी सगळा पत्रव्यवहार केला आहे. लेखी येऊ द्या. एखादा ठेकेदार काम करत नसेलतर

त्याच्यावर त्वरित कारवाई करा. जर माझ्यावर कारवाई केलीतर पुढील ठेकेदार सावध होतो. तो निश्चितपणे चांगले काम करतो. त्याला दहा लाख दंड करा. पन्नास लाख दंड करा की त्याने पुन्हा आयुष्यात उठलेच नाही पाहिजे. ऐनपावसाळ्याच्या तोंडावर तो काम करणार नाही असे म्हणतो. त्याचा हा अतिरेकीपणा आपण का सहन करायचा. त्याचा महानगरपालिकेशी काही व्यवहार आहे का. कुठेतरी त्याच्यावर त्वरित कारवाई झाली पाहिजे. मी यासंदर्भात आयुक्तांशी सुद्धा बोलले. माझ्याकडे प्रभागात गाड्या द्यायच्या आहेत. मी गाडी मागितल्यानंतर माझ्या प्रभागात त्वरित गाडी आली पाहिजे. मा.आयुक्त साहेब, एकूण चार कर्मचारी आहेत. पण त्यांच्याकडे त्यातले फक्त दोन कर्मचारी आहेत. या कर्मचा-यांना जेटींग मशीनबरोबर जावे लागते. शिवाय त्यांना रोजच्या ड्रेनेजच्या कंम्प्लेण्ट सोडवाव्या लागतात. हे दोन कर्मचारी ड्रेनेजच्या कंम्पलेण्ट सोडवतील का जेटींग मशीनबरोबर जातील. जेटींग मशीनबरोबर त्यांचा एकही कर्मचारी नसतो. आपल्या कम्प्लेण्ट तशाच राहतात. त्यामुळे आख्या दिवसभरात हार्डली एक किंवा दोन चेंबरचे क्लिनींग, तेसुद्धा आपण तिथे उभे राहिलोतर होते, नाहीतर तेही होत नाही. म्हणजे सगळे रामभरोसे अशी सगळ्या शहराची अवस्था. टेंडरचा विषय पाहिला. आज चांगल्या प्रकारे सांगितले गेले. आयुक्त साहेबांशी चर्चा केली. डेमो पाहिला. तर खरेच चांगल्या प्रकारे काम होणार आहे का. बकेटने ड्रेनेज क्लिनींग करणार आहोत. कुठेही कसल्याही प्रकारचे आपल्याला आढळत नाही. ठेकेदारांच्या स्वतःच्या मालकीच्या गाड्या असल्या पाहिजेत. असे टेंडरमध्ये नमूद केले होते. या ठेकेदाराला काम का दिले. दिलेतर हरकत नाही पण खात्री पाहिजे होती की, काम दिलेतर तो ते वर्षभरात करेल, टेंडरची ऑर्डर पूर्ण करेल. असे कुठेही आढळत नाही. मा.आयुक्त साहेब, मी सन्मा.महापौर यांना विनंती करते की, जो कोणी ठेकेदार आहे त्याच्यावर त्वरित कारवाई करायचे आदेश द्यावेत. आमच्याकडे गाडी मागवल्यानंतर जेटींग मशीन असते, आम्हाला प्रभागातल्या समस्या सोडवण्यासाठी जी काही मदत लागेल, यंत्रणा लागेल, ती तुम्ही क प्रभागाला त्वरित पूर्ण करून द्यावी. मग तुम्हाला तुमचे कागद जे काही रंगवायचे असतील ते तुम्ही तुमच्या पद्धतीने रंगवून घ्या. परंतू गाडी मागितल्यानंतर, ताई, असे व्हायचे आहे, तसे व्हायचे आहे. मग चार लोक त्या दिवसांत बोलवायला लागतात. माझ्याकडे ११.३० वा. ला गाडी आली होती. काम पाऊणला सुरु केल्यानंतर ३.०० वा. काम करण्यासाठी बीव्हीजीचा ठेकेदार आला. तो म्हणाला, माझ्याकडे गाडीतले पाणी संपत आले आहे. मग त्याच्याशी हुज्जत घालायची का. ११.३०वा. ला काम सुरु केले ते २.३० वा. ला संपले. ते आपल्याकडे आठ तासांच्या बोलीवर येतात. आणि तीन तास काम केल्यानंतर त्यांच्या गाडीतले पाणी संपत असेलतर त्यांच्याशी पुन्हा हुज्जत घालायची का. तुमचे पाणी कसे संपले. पाणी भरुन या. साधारणतः ११.३० ला काम सुरु केले. २.३० ला संपवले. दोन चेंबर काढले. कुठेतरी सांगायला लागते. उभे राहून काम करुन घेणे. ज्या काही जागा रिक्त आहेत, त्या जागा पहिल्या भरा. तुमचा एक अधिकारी नऊ प्रभागांमध्ये काम पाहत असेलतर तो उभा राहू शकत नाही. उभा राहून काम करु शकत नाही. म्हणून आम्हाला उभे राहून काम करुन घ्यावे लागते. सन्मा.महापौर यांना विनंती आहे की, येत्या चार दिवसांत माझ्या प्रभागातला हा विषय पूर्णपणे सुटेल असा शब्द द्यावा. त्यात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. जी काही व्यवस्था लागेल ती माझ्याकडून उपलब्ध करुन दिली जाईल.

**मा.महापौर-**आत्ता मा.आशाताई शेंडगे यांनी जी सूचना मांडली. त्यांच्या वॉर्डमध्ये गाडी उपलब्ध झाली पाहिजे. पावसाळा जवळ आला आहे. सगळ्या ड्रेनेज लाईन्स पूर्ण करा. स्वच्छता लवकर झाली पाहिजे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.उल्हास शेट्टी-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ८८६ विषय क्रमांक-६

दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.नगरसचिव

**<u>मा.विधी समिती</u>**

अ) दि.६/५/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२०/५/२०१६ व २६/५/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.शत्रुघ्न काटे-**मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.उल्हास शेट्टी-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ८८७ विषय क्रमांक-७

दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

अ) दि.२७/४/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.११/५/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.शत्रुघ्न काटे-**मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.उल्हास शेट्टी-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ८८८ विषय क्रमांक-८
दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.५/५/२०१६ व ७/५/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.शत्रुघ्न काटे-**मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -
अनुकूल-८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.उल्हास शेट्टी-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ८८९ विषय क्रमांक-९
दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.नगरसचिव

**मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

दि.४/५/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.शत्रुघ्न काटे-**मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -
अनुकूल-८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.संजय काटे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ८९० विषय क्रमांक-१०
दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) महापालिका आयुक्त यांचेकडेकडील पत्र क्र.
स्था/बीआरटीएस/४७९/२०१६ दि.२०/०६/२०१६

बोपखेल गावासाठी दापोडी येथून CME हद्दीतुन जाणारा रस्ता, मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये दि. १३/०५/२०१५ रोजी CME द्वारे बंद करण्यात आला आहे.

बोपखेल गावाच्या रस्त्या बाबत तोडगा काढण्यासाठी मा. ना. श्री मनोहर पर्रीकर संरक्षण मंत्री, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली दि. २०/११/२०१५ रोजी सकाळी ८-३० वा. नविन सर्किट हाऊस पुणे येथे संबंधित सर्व विभाग College of Military Engineering (CME), Amunation Factory Khadki (AFK), Khadki Cantonment Board (KCB), Defence Estate Officer (DEO),PCMC यांचे अधिकारी व लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक झाली. या बैठकीमध्ये,बोपखेल गावसाठी CME मार्फत उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या (तरंगत्या) पुलाजवळ कायमस्वरुपी पुल पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत बांधण्यात यावा असे ठरले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत या पुर्वी सुचविल्याप्रमाणे मुळा नदीवरील पुल ते खडकीतून जाणारा, Elphistone roadव्हाया टँक रोड हा रस्ता पक्क्या स्वरुपात करण्याच्या अनुषुंगाने या विभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले असून पुर्वी निश्चित केले प्रमाणे १९२ मीटर नदीवरील पुल व उत्तर व दक्षिण बाजुकडील पोहच रस्ते ५४७ मीटर (बोपखेल बाजु २१५ मीटर खडकी बाजु ३३२ मीटर) यासाठी रक्कम रु.- १८ कोटी खर्च अपेक्षित होता.

सदर कामाचे अंदाजपत्रक सा.बां. विभाग सन २०१४-१५ व मान्य दरपृथ:करणानुसार तयार केलेले आहे. मनपाचे अंदाजपत्रकातील पान क्र. ५३ अनु.क्र. १८५ नुसार कामास र.रु. २०,००,००,०००/- इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस महापालिका सभा ठराव क्र. ८५० दिनांक २०/४/२०१६ अन्वये प्रशासकिय मान्यता मिळाली आहे.

मा. संरक्षणमंत्री, भारत सरकार यांच्या सुचनेनुसार सदर पुल बांधणे व रस्ता करणे कामासाठी संबंधित विभाग म्हणजेच AFK,KCB व DEO यांचे कडे पत्र क्र. Civil /BRTS / 505 / 2015 dt: 23/12/2015 अन्वये NOC बाबत विचारणा करण्यात आली होती. त्याअनुषंगाने श्री. N.P. नाईक Jt. General Manager AFK खडकी यांनी त्यांचे पत्र क्र. २१५७६/AL/CC/EO/AFK/2016-17 दि.11/05/2016 अन्वये Ordnance factory Board कोलकाता यांनी Tank road हा बोपखेलसाठी पर्यायी मार्ग म्हणून मान्यता दिले बाबत कळविले आहे.

पाटबंधारे विभाग यांना पत्र क्र. स्था/काअ/बीआरटीएस/73/2016 दि. 10.02.2016 अन्वये प्रस्तावीत पुल व नियोजनबाबत कळविण्यात आले होते व अभिप्राय विचारणा करण्यात आली होती. कार्यकारी अभियंता पाटबांधारे विभाग यांनी त्याचे दि.२२/०२/२०१६ चे पत्रान्वये

सदर पुलाचे अंत्यस्तंभ (Abutment) नदीच्या निळया पुररेषेच्या (BlueFlood Line) आत न ठेवता, तसेच निळया पुररेषेच्या (Blue Flood Line) आत कोणतेही भराव (filling) काम प्रस्तावीत न करता आराखडा तयार करावा असे कळविले आहे.

कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग यांनी सुचविलेप्रमाणे पुलाचा अंत्यस्तंभ (Abutment) नदीपात्राच्या निळया पुररेषेबाहेर (Blue Flood Line) करावयाचे झाल्यास एकूण १०४० मीटर Viaduct व उत्तर व दक्षिण बाजुकडील पोहच रस्ते १३८.९२४ मीटर (बोपखेल बाजु ७०.५४६ मीटर खडकी बाजु ६८.३७८ मीटर) असा पूल बांधावा लागणार आहे. यासाठी अंदाजे रक्कम रु. ४५.०० कोटी ऐवढा खर्च अपेक्षित आहे.

दिनांक ३०/५/२०१६ रोजी मा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मा. जिल्हाधिकारी पुणे, मा. खासदार, मा. आमदार, मा. महापौर पिं. चिं. मनपा तसेच सर्व स्थानिक लोक प्रतिनिधी व पदाधिकारी तसेच संरक्षण विभाग, सिंचन विभाग व मनपाकडील अधिकारी यांच्या समवेत झालेल्या चर्चेत मा. आयुक्त यांनी कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग यांनी सुचविलेप्रमाणे पुलाचा अंत्यस्तंभ (Abutment) नदीपात्राच्या निळया पुररेषेबाहेर (Blue Flood Line) करावा लागणार असल्याने पूल बांधणीच्या खर्चात वाढ होणार असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

बोपखेल येथे मुळा नदीवर पूल बांधणेचे काम सुरु करण्याचे मनपाचे नियोजन आहे. कामाची तातडी लक्षात घेऊन सदर कामाची निविदा प्रसिद्ध करणे व प्रत्यक्ष पूलाचे काम करणे यासाठी लागणारा कालावधी याचा विचार करता सदरच्या विषयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १के अंतर्गत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

विषयांकित कामाची अंदाजपत्रकीय र.रु.४२,००,००,०००/-(अक्षरी र.रु.बेचाळीस कोटी फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे -** मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.प्रशांत शितोळे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो. मागील मा.महापालिका सभेत आपण प्रशासनाला अशी सूचना दिली होती की, प्रस्तावात कोणाचेही नाव देऊ नये. तरीसुद्धा या वन के च्या प्रस्तावात सन्मा.पदाधिका-यांचे नाव आले आहे. हे काम न करण्यामागची भूमिका नाही. परंतू आपापल्यात वाद नको. जेणेकरुन आपापल्यात वाद होऊ नये म्हणून या वेळीही तशीच विनंती करतोय. संबंधित नावं वगळून हा प्रस्ताव वाचतोय.

विषय क्रमांक-११

दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) महापालिका आयुक्त यांचेकडेकडील पत्र क्र.
स्था/बीआरटीएस/४७७/२०१६ दि.२०/०६/२०१६

पिंपळे गुरव येथील आरक्षण क्रं. ३५० येथे बस टर्मिनल विकसित करण्याबाबत मा. महापौर यांनी २० ऑक्टोंबर २०१५ रोजीच्या पत्रानुसार मा. आयुक्त सो यांजकडे मागणी केली आहे. तसेच चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे सन्माननिय आमदार यांनी दि. २७ एप्रिल २०१६ रोजी तत्कालीन मा. आयुक्त सो. यांच्या उपस्थितीत अँटोक्लस्टर येथे प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव मधील विविध विकास कामांसंदर्भात आयोजित बैठकीमध्ये टर्मिनल्स बांधणेबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत आढावा घेतला आहे.

विषयांकित कामासाठी सन २०१६-१७ च्या महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये 'स्थापत्य विशेष योजना' या लेखाशिर्षाअंतर्गत अंदाजपत्रकीय र.रु.२.० कोटीच्या कामासाठी र.रु. ५०.० लाख तरतुद करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पास मा. महापालिका सभा ठराव क्र. ८५० दि. २० एप्रिल २०१६ अन्वये प्रशासकिय मंजूरी घेण्यात आली आहे. या कामासाठी वास्तूविशारद (Architect) पदी मे. अर्थस्केप आर्किटेक्टस् चे सचिन शहा यांची नेमणूक करणेस दि ३०/१२/२०१५ च्या मा. आयुक्त सो. पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील कार्यालयीन टिपणीनुसार मान्यता घेण्यात आली आहे. तसेच मा. स्थायी समिती ठराव क्र. १४६५१ दि. १२/०१/२०१६ नुसार बस टर्मिनल विकसित करणेसाठी वास्तुविशारदपदी मे. अर्थस्केप आर्किटेक्ट यांची नेमणूक करणेस मान्यता घेणेत आली आहे. वास्तुविशारद मे. अर्थस्केप यांनी विषयांकित कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यानुसार पिंपळे गुरव येथे बस टर्मिनल्स बांधणे या कामासाठी स्थापत्य व विद्युत विषयक कामांच्या बाबींची एकत्रित अंदाजपत्रकीय र.रु. ३,६०,००,०००/- येत आहे

बस टर्मिनल्स विकसीत करणेसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO)PMPML व मा.सहव्यवस्थापकीय संचालक (Joint Managing Director) यांचेशी चर्चा केल्याप्रमाणे विकसित करावयाच्या बस टर्मिनल्सला सिमाभिंत बांधणे, बस स्टॅन्ड, पास केंद्र, ऑफिस, प्रत्येकी १५० चौ.फुटाच्या सहा केबीन, महिला प्रवासी व पुरूष प्रवासी यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधणे, कर्मचा-यांसाठी Changing Room, Rest Room, इ. बाबींचा अंतर्भाव करणेत आला आहे. बस टर्मिनल्ससाठी आवश्यक आराखडा तयार करून पी.एम.पी.एम.एल.च्या वाहतूक व्यवस्थापक यांचा ना हरकत दाखला प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्षात काम करण्याचे नियोजन आहे.

सन २०१६-१७ मध्ये उपलब्ध तरतुद र.रु. ५०,००,०००/- असुन उपलब्ध तरतुदीनुसारच काम करण्यात येणार आहे. तसेच या कामी पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात आवश्यक तरतुद उपलब्ध करण्याची जबाबदारी खात्याची राहील.

पिंपळे गुरव येथे बस टर्मिनल्स बांधणेचे काम सुरु करण्याची तातडी लक्षात घेऊन सदर कामाची निविदा प्रसिद्ध करणे व प्रत्यक्ष काम करणे यासाठी लागणारा कालावधी याचा विचार

करता सदरच्या विषयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १के अंतर्गत मान्यता घेणे आवश्यक आहे.

विषयांकित कामाची अंदाजपत्रकीय र.रु.३,६०,००,०००/-(अक्षरी र.रु. तीन कोटी साठ लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.उल्हास शेट्टी –** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य उदयान विभागाकडील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात पान क्र. ३४७ अ.क्र.१९५ वर प्रभाग क्र.३९ मधील उदयानाची स्थापत्य विषयक कामे करणे या कामाचा समावेश आहे सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.८५० दि.२०/०४/२०१६ अन्वये र.रु.४५,००,०००/- या अपेक्षित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तथापि सदर कामामध्ये करण्यात येणा-या नूतनीकरणाच्या कामाची व्याप्ती विचारात घेता व वाढीव खर्चाचा विचार करता मूळ प्रशासकीय मान्यता दिलेली रक्कम ४५,००,०००/- + वाढीव प्रशासकीय रक्कम रु.१,०५,००,०००/- अशी एकूण सुधारित अंदाजपत्रकीय र.रु.१,५०,००,०००/- ला मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. १० मधील जुनी भाजी मंडईची सुधारणा करणे (निविदा क्र.१८/१३/२०१५-१६) हे काम मे.जी.के. कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत चालु आहे. सदर कामास र.रु.४५,००,०००/- इतकी मुळ प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामाचे नकाशे व डिझाईन यामुळे सदर कामाची व्याप्ती वाढत असुन त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.६५,००,०००/- (वाढीव र.रु.२०,००,०००/-) इतकी येत आहे. तरी सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.६५,००,०००/- यास मान्यता देणेत यावी.

**मा.शत्रुघ्न काटे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम**- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - विषय क्र.११ मध्ये “मा.महापौर सौ.शकुंतलाताई भाऊसाहेब धराडे” या मजकुराऐवजी “मा.महापौर” हा मजकुर तसेच “सन्माननिय आमदार श्री.लक्ष्मण जगताप” या मजकुराऐवजी “सन्माननीय आमदार” हा मजकुर समाविष्ट करणेत यावा.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.प्रशांत शितोळे-** मा.महापौर साहेब,उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ८९१ विषय क्रमांक-११
दिनांक-२०.६.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) महापालिका आयुक्त यांचेकडेकडील पत्र क्र.
स्था/बीआरटीएस/४७७/२०१६ दि.२०/०६/२०१६

पिंपळे गुरव येथील आरक्षण क्रं. ३५० येथे बस टर्मिनल विकसित करण्याबाबत मा. महापौर यांनी २० ऑक्टोंबर २०१५ रोजीच्या पत्रानुसार मा.आयुक्त सो यांजकडे मागणी केली आहे. तसेच चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे सन्माननिय आमदार यांनी दि. २७ एप्रिल २०१६ रोजी तत्कालीन मा. आयुक्त सो. यांच्या उपस्थितीत अँटोक्लस्टर येथे प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव मधील विविध विकास कामांसंदर्भात आयोजित बैठकीमध्ये टर्मिनल्स बांधणेबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत आढावा घेतला आहे.

विषयांकित कामासाठी सन २०१६-१७ च्या महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये 'स्थापत्य विशेष योजना' या लेखाशिर्षाअंतर्गत अंदाजपत्रकीय र.रु.२.० कोटीच्या कामासाठी र.रु. ५०.० लाख तरतुद करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पास मा. महापालिका सभा ठराव क्र. ८५० दि. २० एप्रिल २०१६ अन्वये प्रशासकिय मंजूरी घेण्यात आली आहे. या कामासाठी वास्तूविशारद (Architect) पदी मे. अर्थस्केप आर्किटेक्टस् चे सचिन शहा यांची नेमणूक करणेस दि ३०/१२/२०१५ च्या मा. आयुक्त सो. पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील कार्यालयीन टिपणीनुसार मान्यता घेण्यात आली आहे. तसेच मा. स्थायी समिती ठराव क्र. १४६५१ दि. १२/०१/२०१६ नुसार बस टर्मिनल विकसित करणेसाठी वास्तुविशारदपदी मे. अर्थस्केप आर्किटेक्ट यांची नेमणूक करणेस मान्यता घेणेत आली आहे. वास्तुविशारद मे. अर्थस्केप यांनी विषयांकित कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यानुसार पिंपळे गुरव येथे बस टर्मिनल्स बांधणे या कामासाठी स्थापत्य व विद्युत विषयक कामांच्या बाबींची एकत्रित अंदाजपत्रकीय र.रु. ३,६०,००,०००/- येत आहे

बस टर्मिनल्स विकसीत करणेसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO)PMPML व मा.सहव्यवस्थापकीय संचालक (Joint Managing Director) यांचेशी चर्चा केल्याप्रमाणे विकसित करावयाच्या बस टर्मिनल्सला सिमाभिंत बांधणे, बस स्टॅन्ड, पास केंद्र, ऑफिस, प्रत्येकी १५० चौ.फुटाच्या सहा केबीन, महिला प्रवासी व पुरूष प्रवासी यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधणे, कर्मचा-यांसाठी Changing Room, Rest Room, इ. बाबींचा अंतर्भाव करणेत आला आहे. बस टर्मिनल्ससाठी आवश्यक आराखडा तयार करून पी.एम.पी.एम.एल.च्या वाहतूक व्यवस्थापक यांचा ना हरकत दाखला प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्षात काम करण्याचे नियोजन आहे.

सन २०१६-१७ मध्ये उपलब्ध तरतुद र.रु. ५०,००,०००/- असुन उपलब्ध तरतुदीनुसारच काम करण्यात येणार आहे. तसेच या कामी पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात आवश्यक तरतुद उपलब्ध करण्याची जबाबदारी खात्याची राहील.

पिंपळे गुरव येथे बस टर्मिनल्स बांधणेचे काम सुरु करण्याची तातडी लक्षात घेऊन सदर कामाची निविदा प्रसिद्ध करणे व प्रत्यक्ष काम करणे यासाठी लागणारा कालावधी याचा विचार

करता सदरच्या विषयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १के अंतर्गत मान्यता घेणे आवश्यक आहे.

विषयांकित कामाची अंदाजपत्रकीय र.रु.३,६०,००,०००/-(अक्षरी र.रु. तीन कोटी साठ लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य उदयान विभागाकडील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात पान क्र. ३४७ अ.क्र.१९५ वर प्रभाग क्र. ३९ मधील उदयानाची स्थापत्य विषयक कामे करणे या कामाचा समावेश आहे सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ८५० दि.२०/०४/२०१६ अन्वये र.रु.४५,००,०००/- या अपेक्षित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तथापि सदर कामामध्ये करण्यात येणा-या नूतनीकरणाच्या कामाची व्याप्ती विचारात घेता व वाढीव खर्चाचा विचार करता मूळ प्रशासकीय मान्यता दिलेली रक्कम ४५,००,०००/- + वाढीव प्रशासकीय रक्कम रु.१,०५,००,०००/- अशी एकूण सुधारित अंदाजपत्रकीय र.रु.१,५०,००,०००/- ला मान्यता देणेत येत आहे तसेच प्रभाग क्र.१० मधील जुनी भाजी मंडईची सुधारणा करणे (निविदा क्र.१८/१३/२०१५-१६) हे काम मे.जी.के.कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत चालु आहे. सदर कामास र.रु.४५,००,०००/- इतकी मुळ प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामाचे नकाशे व डिझाईन यामुळे सदर कामाची व्याप्ती वाढत असुन त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु. ६५,००,०००/- (वाढीव र.रु.२०,००,०००/-) इतकी येत आहे. तरी सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.६५,००,०००/- यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/१०/कावि/५५/२०१६
दिनांक – २५/०७/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.